
काव्य
२५१२




REFBK-0025873
REFBK-0025873

संस्कृत काव्य

२५८२
२५८६३
११।३।८९

२५८२
काव्य २५८६३
११।३।८९

# रंग
# माझा
# वेगळा

सुरेश भट

REFBK-0025873

साहित्य प्रसार केंद्र

पहिली आवृत्ती : मार्च १९७०
(मौज प्रकाशन, मुंबई)
दुसरी आवृत्ती : मार्च १९८१
तिसरी आवृत्ती : ऑगस्ट १९८२
चवथी आवृत्ती : ऑगस्ट १९८७

© सौ. पुष्पा सुरेश भट

प्रकाशक
भा. ल. कुळकर्णी
साहित्य प्रसार केंद्र
सीताबर्डी, नागपूर–४४० ०१२

मुद्रक
म. पां. वनहट्टी
नारायण मुद्रणालय
२२४, टिकेकर रोड
धनतोली, नागपूर–४४० ०१२

२५८२
काव्य २५८६३
११/३/६९

# प्रास्ताविक : पु. ल. देशपांडे

सुरेश भटांची कविता एके दिवशी मला अचानक भेटली. आणि नवकवितेच्या ह्या जमान्यात नुसत्या निरनिराळ्या रंगांचेच नव्हे, तर निराळ्या अंतरंगाचे दर्शन घडले. त्या कवितेचा बाज आणि साज हा सर्वस्वी निराळा नव्हता. पण प्रसादगुणाशी फारकत घेतलेल्या आधुनिक कवितेच्या युगात ह्या हृदयीचे त्या हृदयी घातल्यासारखी ही कविता एकदम मनात शिरली. मुंबईच्या जीवघेण्या उकाड्यात राहणाऱ्या माणसाच्या अंगावरून दैवयोगाने किंवा निसर्गाच्या एखाद्या चमत्कारामुळे दक्षिण वायूची शीतल झुळूक जावी, तशी ही कविता अंगावरून गेली. त्या कवितेतले फुललेपण मोहक होते. कळ उमटवून जाण्याची तिची ताकदही मोठी होती. आणि त्या कवितेत सुगंधासारखे गाणे दडलेले होते. हे गाणे अंगभूत होते. कुणीतरी गायल्यामुळे त्या कवितेचे गाणे झाले नव्हते. कवितेला गाण्याची सक्ती नसावी. तशी तिला कसलीच सक्ती नसावी. किंबहुना, आजकाल कानावर जी गीते पडतात ती तर बळजबरीने सुरांच्या चरकातून पिळून काढल्यासारखी वाटतात. त्या गीतांना गात गात हिंडण्याची अंतरीची ओढ नसते. ते शब्द सुरांसाठी तहानलेले नसतात. त्यांत सूर कोंदलेले नसतात, कोंबलेले असतात. गीतात सुरांतून उमटण्याचा अपरिहार्यपणा असावा लागतो. त्या-उलट, काही कविता अत्यंत समंजसपणाने गाण्यापासून आपण होऊन दूर राहिलेल्या असतात. त्यांचे व्यक्तिमत्त्वच असे असते की, सुरांचा त्यांना नसता भार व्हावा. चांगली नवकविता अशी जाणूनबुजून गाण्यापासून दूर राहिली. तिच्या स्वभावातच गाणे नव्हते. तरीही ती कविता असते. गाणे आणि कविता ह्यांचे अतूट नाते नाही. जसे प्रासानुप्रास किंवा यमक यांचे नाही तसेच. पण म्हणून गाणे होऊन प्रकटणाऱ्या कवितेचे दिवस संपले असे मानू नये किंवा गाणे होऊन प्रगटल्यामुळे तिचा दर्जा दुय्यम झाला अशाही गैरसमजात राहू नये.

एक काळ असा होता की कविता कानावाटेच मनात शिरायची, कवी कविता गाऊन दाखवीत. मुद्रणकला आली आणि कवितेचा छापील ठसा डोळ्या-पुढे येऊ लागला. ती आता मूकपणाने डोळ्यावाटे मनात शिरू लागली. मनातल्या मनात कविता वाचण्याची पद्धत तशी अलीकडली. ठराविक ठशातून कागदावर

उमटणाऱ्या अक्षरांमुळे तोंडातून उमटणाऱ्या नादातून होणारा संस्कार नाहीसा झाला. एका परिमाणाची वजावाकी झाली. हे उणेपण घालवण्याचा र० कृ० जोशी यांच्यासारख्या कवीने त्या अक्षरांना चित्ररूप देऊन प्रयत्न केला, गीतांनी सुरांतून उमटावे तसे त्यांच्या कवितांना त्यांनी चित्राक्षरांतून उमटवण्याचा प्रयत्न केला. जोशी चित्रकार असल्यामुळे त्यांनी मोठ्या सहजतेने चित्ररूपातून कविता प्रगटवली. भटांची कविता गात येते. ते काही गायनकलापारंगत गायक नाहीत. पण अंतःकरणात मात्र सुरांचा झरा आहे. एका अर्थी ते भारतीय संगीतकलेचा पद्धतशीर अभ्यास केलेले गायक नाहीत हे चांगले आहे. अजाणतेपणाने काही सूर त्यांच्या मनात वसतीला उतरतात. फुलाला चित्रकलेचा डिप्लोमा असावा लागत नाही. ज्या मातीतून ते रुजून फुलते तिथेच ते रंग दडलेले असतात. भटांच्या मनोभूमीत निसर्गतःच सूर दडलेले आहेत. ज्यांची कविता अशीच गात गात फुटते असे माझ्या आवडीचे बा० भ० बोरकर हे कवी आहेत. हा पिंडाचा धर्म आहे. पु० शि० रेग्यांना भेटणारे शब्द जसे सतत फुलपाखरांसारखे त्यांच्या अवतीभवती हिंडत असल्यासारखे वाटतात, तसेच सुरेश भटांच्या भोवती हे सूर हिंडत असावेत. मनात फुलत जाणाऱ्या कवितेने ह्या सुरांच्या गळ्यात गळा घालून केव्हा गायला सुरुवात केली, हे सुरेश भटांनाही कळत नसावे. म्हणूनच त्यांच्या गीतांना चाली देणाऱ्या संगीत दिग्दर्शकांच्या गुणवत्तेविषयी मला आदर असूनही, सुरेश भट त्या गीताबरोबर जन्माला आलेल्या चालीत जेव्हा आपली कविता गाऊ लागतात त्या वेळी ते गीत आणि गाणे एक होऊन येते. कुणीही कुणावर मात करण्यासाठी येत नाही. वरपांगी अत्यंत अस्ताव्यस्त दिसणारा हा कवी, त्याची ती कविता आणि त्याचे ते गाणे हे तिन्ही घटक त्या कवितेच्या संपूर्ण आस्वादाला आवश्यक असावेत असे वाटायला लागते. हे एक विलक्षण अद्वैत आहे.

सुरेश भटांना गझलेचे फार मोठे आकर्षण आहे. कारण 'गझल' हे केवळ वृत्त नसून ती एक वृत्ती आहे. एवढेच नव्हे तर तिच्यात एक सूक्ष्म आणि सुंदर निवृत्तीही आहे. स्वार्थाच्या बाजारात धडपडण्याला आपण चुकीने प्रवृत्ती मानीत आलो आहो. क्षणभर निवृत्त मनाने जगाकडे पाहता आल्याशिवाय खऱ्या प्रवृत्तीची गोडीच कळत नाही. जीवनात नुसत्याच उंदीर–उड्या मारीत धावत सुटणे म्हणजे प्रवृत्त जीवन जगणे नव्हे. निव्वळ जगण्यासाठी म्हणून करावी लागणारी धावपळ कुणाला सुटली आहे? पण काही क्षण त्या धावपळीचा अन्वयार्थ लावण्यासाठी काढावे लागतात. असा एखादा क्षणच कवितेला जन्म देऊन जातो. त्यातूनच मग आजूबाजूच्या दगडाधोंड्यांच्या पलीकडले दिसायला लागते. न कळत ते पाहत राहण्याचा, शोधत राहण्याचा छंद जडतो. आणि मग आपले नाते निराळ्याच ठिकाणी जडते. बिलंदरपणाने जगणाऱ्या माणसांत असा

माणूस कलंदर ठरतो. ही कलंदरी सहजसाध्य नसते किंवा तिचे सोंगही आणून भागत नाही. ती अनुभूती जेव्हा कवितेतून उमटते, त्या वेळी तिचा अस्सलपणा आणि नकलीपणा बरोबर ओळखता येतो. सुरेश भट जेव्हा **'मागता न आले म्हणुनी राहिलो भिकारी'** म्हणतात, त्या वेळी त्या न मागण्याच्या वृत्तीमुळे लाभलेली श्रीमंती त्यांना गवसली आहे हे उमजते. लाचारांचा आचारधर्म पाळला नाही म्हणून त्यांना दुःख नाही, तर अपार आनंद आहे. आणि सुरेश भटांशी ज्यांचा परिचय आहे त्यांना त्यांच्या फाटक्या खिशाचा हेवा वाटावा अशी वस्तुस्थिती आहे. कवीचे काव्य आणि त्याचे खाजगी जीवन यांची सांगड घालायचा कुणी आग्रह धरू नये. माणूस चोवीस तास एकच भाववृत्ती घेऊन जगत नसतो. काव्यातल्या कलंदरीचा, सौंदर्याचा, चांगल्या आनंदाचा ध्यास प्रत्यक्ष जीवनात घेऊन जगणारा कवी भेटला की अधिक आनंद वाटतो एवढेच. निखळ साहित्यसमीक्षेत 'सुरेश भटांची कविता' एवढाच चर्चेचा विषय असावा. माझ्या सुदैवाने मला सुरेश भटांचा स्नेह लाभला. त्यामुळे त्यांची कविता ऐकताना किंवा वाचताना सुरेश भट नावाचा एक मस्त माणूस मला निराळा काढता येत नाही, ही एक वैयक्तिक मर्यादा मानावी.

सुरेश भटांचा हा कलंदरपणा लोभसवाणा आहे. कारण, कवितेइतकेच त्यांचे कविता ऐकणाऱ्यांवर म्हणजे जीवनातल्या व्यवहारी धडपडीपलीकडे काही पाहू इच्छिणाऱ्यांवर, ते जाणून घेण्याची तळमळ असणाऱ्यांवर प्रेम आहे. महाराष्ट्रात ठिकठिकाणी काव्यगायनाच्या कार्यक्रमांतून ते ज्या तबियतीने विदग्ध समाजापुढे आपली कविता गातात, तितक्याच मस्तपणाने उमरावतीतल्या रिक्षेवाल्यांच्या अड्डयांवरही गातात. रसिकांच्या मळ्यांना पडणारी कुंपणेही त्यांच्या मनाला पटत नाहीत. तशी ही उर्दू शायरीची खास परंपरा आहे. गावात मुशायरा असला की, उर्दू शायरीच्या सर्व थरांतल्या षौकीनांची तिकडे झुंबड उडते. हां हां म्हणता गावातला तहसीलदार आणि टांगेवाला मैफिलीतले मानिंद होऊन बसतात.

सुरेश भटांच्या कवितेत पंडित–अपंडित दोघांनाही हलवण्याचे सामर्थ्य आहे. गझलेमध्ये नाट्याचा मोठा अंश असतो. तसे ह्या गीतप्रकाराचे नाटकातल्या स्वगताशी फार जवळचे नाते आहे. एखादी अकल्पित कलाटणी श्रोत्याला मजेदार धक्का देऊन जाते. गीतातल्या ओळींच्या डहाळ्यांना अनपेक्षित रीतीने मिळणारे झोके धुंदी आणत असतात. शब्दचमत्कृती असते. कल्पनांचे बेभान उड्डाण असते. सुरेश भटांच्या गझलांमधून उर्दू शायरीशी नाते जुळवणाऱ्या अशा गोष्टी आढळतात. पण उर्दू शायरीत जी कित्येकदा शब्दांची आतषबाजी कवितेला गुदमरवून टाकते तो प्रकार त्यांच्या कवितेत होत नाही. उगीचच उर्दू–फारसी शब्दांची पेरणी करून त्यांनी आपल्या कवितेला गझलेच्या बाह्यांगाशी जुळवले

नाही. आकर्षण वाढवायला त्यांनी उगीचच उर्दू भाषेचा सुरमा घालून आपली गझल नटवली नाही. अशा प्रकारची उर्दू शेरोशायरीची नक्कल करणारी गीते आणि शेर मराठीत लिहिले गेले आहेत. असल्या फारसी–उर्दू पोशाखाची सुरेश भटांना गरज वाटली नाही. कारण, ज्या अनुभूतीतून त्यांची कविता उमलते त्या अनुभूतीशी इमान ठेवणे त्यांनी महत्त्वाचे मानले. मानले म्हणण्यापेक्षा ती वृत्तीच त्यांच्या मनातून गझल उमटवीत आली. मराठीत माधव–ज्यूलियनांच्या नंतर लुप्त होत गेलेल्या या काव्यप्रकाराचा जीर्णोद्धार करावा, हा त्यांचा हेतू कधीही नव्हता. एक तर कुठलाही काव्यप्रकार रूढ करावा असा संकल्प सोडून कविता रचणाऱ्या कवीविषयी मला चिंताच वाटत असते. मग तो वृत्तात लिहिणारा असो की मुक्तछंदात ! कवितेने जन्माला येतानाच आपला छंद, वृत्त, जाती जे काही असेल ते घेऊन प्रकट व्हावे. इथे प्रश्न असतो तो मनात उत्कटत्वाने काय सलते आहे त्याचा ! आत खळबळ कसली उडाली आहे हे महत्त्वाचे. सहजतेने उमटलेल्या शार्दूलविक्रीडिताला हट्टाने रचलेल्या मुक्तछंदापेक्षा जुनेपणाचा शेरा मारून खाली ढकलण्याचे कारण नाही. वाल्मीकीचा शोक मंदाक्रांतेतून न प्रकटता अनुष्टुभातून का प्रकटला याला कारण नाही. आणि कालिदासाच्या यक्षाचा विरह अनुष्टुभातून न प्रकटता मंदाक्रांतेतून आला म्हणून काही बिघडले नाही ! कवीच्या अंतःकरणातून उमटलेल्या वेदनेची प्रत आपल्याला जाणवली कशी हे महत्त्वाचे ! दुबळ्या हाती तलवार आली म्हणून त्याला शूर म्हणू नये, तसे समर्थाहाती लेखणी आली म्हणून तिचे सामर्थ्य उणे मानू नये !

आपल्याला जे जाणवले ते अधिकाधिक लोकांना जाणवावे, ही भटांची ओढ मला मोलाची वाटते. त्यांची कविता दुर्बोधतेकडे झुकत नाही. ती कविता ज्या असंख्य हृदयांत ओतावी त्या हृदयांची संख्या ते कुठल्याही अटींनी मर्यादित करीत नाहीत. '**साधीसुधी ही माणसे माझ्या कवित्वाची धनी**' असे ते केवळ उपचार म्हणून म्हणत नाहीत. त्या साध्यासुध्या माणसाशी साधायच्या संवादाचे त्यांना मोल मोठे वाटले. एकच तुकाराम किंवा एकच गालिब अनपढांपासून ते पंडितांपर्यंत सर्व थरांतल्या आणि सर्व दर्जाच्या बुद्धिमत्तेच्या आस्वादकांना नाना प्रकारांनी भेटत असतो. तो प्रकार कुठला का असेना, पण त्यातले काहीतरी जाणवल्याशिवाय त्या कवितेशी संवादच सुरू होत नाही. कवितेतली दुर्बोधता सापेक्ष मानली तरी सुबोधता हा दुर्गुण मानायला नको. वनस्पतिशास्त्रज्ञाला चारचौघांपेक्षा फूल अधिक कळत असेल. पण त्याचे रंग आणि गंध प्रथम सामान्य माणसासारखे त्याला आकर्षित करीत नाहीत असे थोडेच आहे ?

सुरेश भटांची कविता आजच्या नवकवितेच्या एका निराळ्या वातावरणातही आपले अंगभूत सौंदर्य घेऊन प्रकटली आहे. नाना प्रकारच्या भाववृत्तींचा इथे

फुलोरा आहे. ‘ निराशेचा गाव आंदण आम्हासी ’ म्हणणाऱ्या संतांची निराशाही त्यांच्या कवितेतून दिसते. अशा एखाद्या क्षणी तेही

‘ भोवताली हिंडतो ही माणसे प्रेतांपरी ।
काय ह्या गावात सुद्धा एकदा होती घरे ?’

असा उदास करणारा प्रश्न विचारीत येतात. हा प्रश्न काय त्यांना एकट्यालाच पडतो ? जगताना आपल्या संवेदना बोथट होऊ न देता जगणाऱ्या सगळ्यांनाच आज पडणारा हा प्रश्न आहे. मुंबईसारख्या विराटपुरीत राहणाऱ्या माणसाला भोवतालचे दैन्यदुःख पाहण्याचे टाळत टाळत जगावे लागते. एखाद्या क्षणी स्वतःचे ते डोळे असून न पाहता आणि कान असून न ऐकता कंठावे लागणारे जिणे आठवले की, त्या हिंडणाऱ्या प्रेतांतले आपणही एक आहोत याची जाणीव होते. त्या प्रश्नाला लाभलेले काव्यरूप त्यालाही अधिक उत्कटतेने अस्वस्थ करून जाते. असले नाना प्रकारच्या भावनांचे तरंग उठवणे हेच तर कलेचे कार्य असते. ते तरंगच आहार–निद्रा–भय–मैथुनाच्या पलीकडच्या जीवनाचे माणसाला स्मरण देऊन जातात. चांगले साहित्य माणसाला अंतर्मुख करते. ज्या गलबल्यात आपल्याला जगावे लागते त्यातून दूर पळून जाण्याने माणसाची सुटका नाही. त्यात पुरुषार्थही नाही. सुरेश भटांची वृत्ती पळून जाणाऱ्याची नाही. जगताजगता क्षणभर त्रयस्थ होणाऱ्याची आहे. जीवनाच्या नाटकात भूमिका करताकरता क्षणभर प्रेक्षक होणाऱ्याची आहे. खेळताखेळता तो आपलाच खेळ पाहणाऱ्याची आहे. कलावंताचे ‘ स्व ’–तंत्रपण ते हेच ! ही वृत्ती ‘ गुंतुनी गुंत्यात साऱ्या, पाय माझा मोकळा ’ ह्या ओळीत भटांनी व्यक्त केली आहे. इथे त्यांची रसिकता चटकन परतत्त्वाला स्पर्श करून गेली आहे. जीवनाच्या ह्या खेळाचा कुणी अर्थ काढू नये. तसा त्याला स्वतःचा असा अर्थ नाही. पण खेळाचा आनंद आहे. जिंकण्या–हरण्याचे सुखदुःख आहे. काही नाजुक बंधने आहेत. त्या बंधनात गुंतणे आहे, त्यांतूंन सुटणे आहे, तुटणे आहे. हे सारे माणसाने निर्माण केले आहे. पण हा सारा खेळ आहे याची जाणीव ठेवून जगणे ह्या लेकुरांच्या गोष्टी नव्हेत ! सुरेश भटांची कविता वाचताना आनंद वाटतो तो, ह्या खेळात आपल्याला पडणारे प्रश्न त्यांच्या कवितेतून नेमके शब्दरूप लेवून प्रकटल्याचा. अर्थात नित्य व्यवहारातल्या प्रश्नांपलीकडले प्रश्नही सगळ्यांनाच पडतात असे नाही. सुरेश भटांनी विचारलेला ‘ हे खरे की ते खरे ?’ हा प्रश्न सनातन आहे. जीवनाच्या ह्या विराट स्वरूपाकडे क्षणभर थबकून पाहण्याची बुद्धी होणाऱ्यांना हा प्रश्न नेहमीच पडतो. सुरेश भटांसारख्या प्रतिभावंत कवीलाही हा प्रश्न पडलेला पाहून अशा लोकांना त्या कवीशी अधिक जवळीक साधल्याचा आनंद होतो. जीवनात गवसल्या आत्मसंतोषापेक्षा न गवसल्याच्या रुखरुखीतूनच काव्य जन्माला येते.

ही अलौकिक रुखरुखच काव्यनिर्मितीमागली मुख्य प्रेरणा असते. कुणी ती शब्दांच्या चिमटीत पकडू पाहतो, कुणी रंगरेषांतून धरू लागतो. हे वेड गतानुगतिकतेतून जाणाऱ्याला कळत नाही. आणि कळत नाही म्हणून रुचत नाही. मग :

'हालती पालीपरी काही जिभा
सारखी माझ्यावरी थुंकी उडे !'

हा अनुभव कलावंताला भोगावा लागतो. गडकऱ्यांनी जिला दीड वितीची दुनिया म्हटले आहे, तिच्यातच सगळ्यांना जगायचे आहे. पण त्या दुनियेतही कुणाच्या तरी डोळ्यातले चांदणे वेचण्याचे क्षण लाभलेले असतात. त्याच दुनियेत 'अमृत-मय मी, अमृतमय तू, तनमन अमृत बनते ग' असा अनुभव लाभतो. सुरेश भटांच्या 'दिवंगताच्या गीता'तली 'असा कसा हा वसंत येई पुन्हा पुन्हा माझियाच दारी' ही ओळ मला फार महत्त्वाची वाटली. तसा तो आला नसता, नव्हे तो येत असतो याची जाणीव सुरेश भटांच्या काव्यातून उमटली नसती, तर त्यांच्या करुण गाण्याची रडगाणी झाली असती. त्यांची कविता हा एक कारुण्य जोपासण्याचा किंवा अश्रूंची आरास मांडण्याचा शौक झाला असता.

ही जाणीव आहे म्हणूनच सुरेश भट केवळ वैयक्तिक सुखदुःखाच्या अनुभूतींना फुंकर घालीत बसणारे कवी नाहीत. आजच्या समाजातले रगडणारे आणि रगडले जाणारे ह्या द्वंद्वाची त्यांना जाणीव आहे. 'तसू तसू दुःखे घेऊन जोजवीत बसणाऱ्यांची आत्मवंचना ज्याची त्याला गाडणार आहे', ह्यावर त्यांचा विश्वास आहे. त्यांचे गीत हे त्यांची वैयक्तिक दुःखे गात फुटावे असे त्यांना वाटत नाही. त्या गीतात 'दुःख संतांचे भिनावे' अशी त्यांना ओढ आहे. असल्या व्यापक दुःखाची जाणीवच कवीला खऱ्या अर्थाने 'कवी' ही पदवी प्राप्त करून देत असते. समान दुःखांच्या अनुभूतीतून माणूस माणसाच्या अधिक जवळ येतो. त्यांनी तुकारामाला उद्देशून—

'तुझे दुःख तुझे नाही
तुझे दुःख आमचे आहे !'

असे म्हटले आहे. सुरेश भटांची कविता वाचताना त्यातल्या दुःखाच्या अनुभूती आस्वादकालाही आपल्या वाटतात. संवाद सुरू होतो. इथेच भटांचे यश आहे. मराठी कवितेच्या प्रांतात भटांना असली आपुलकी आजही लाभली आहे. यापुढे हा आप्तवर्ग खूप वाढेल अशी प्रसादचिन्हे आहेत.

'हाय तरीही बाजारी माझी तोकडी पुण्याई
नाही अजून तेवढी माझ्या शब्दांना कल्हई'

असे जेव्हा सुरेश भट म्हणतात त्यावेळी त्यातला उपरोध लक्षात घ्यायला हवा. ही भटांची तक्रार मानू नये ! पितळ उघडे पडण्याची भीती असणाऱ्यांना कल्हईची गरज पडावी ! इथला सुवर्णकण बावनकशी आहे !

**' माझीया मस्तीत मी जाई पुढे**
**मात्र बाजारू कवाडे लागती !'**

बाजारू कवाडे लागली तरी आज अनेक अंतःकरणांची कवाडे सुरेश भटांच्या कवितांसाठी उघडली गेली आहेत. आणखीही उघडली जाणारच आहेत. दीडवीत छातीच्या माणसांनादेखील आपल्या छातीची रुंदी आणखी खूप वाढावी अशी ओढ नसते असे आपण का मानावे ? तसा एखादा क्षण येऊन त्या चातकाने चोच वासली तर त्या चोचीत धार टाकण्याचे काम कवीलाच करावे लागेल, ह्याची जाणीवही सुरेश भटांना आहे. म्हणूनच ते वैयक्तिक अहंकाराने नव्हे, तर जो ' अमृताचा वसा ' त्यांनी हाती धरला आहे त्यामागच्या कर्तव्याच्या जबाबदारीने म्हणतात की, ' आज मी जे गीत गातो ते उद्या गातील सारे '. त्या उद्याची वाट न पाहता त्यांची गीते आजच लोक गाऊ लागले आहेत. काहीतरी मनात शिरल्याखेरीज कोण कशाला गाईल ? आणि अशी कानातून किंवा डोळ्यातून मनात शिरलेली गीते कधी व्यर्थ का असतात ?

दुनियेतील बाजारू कवाडे नाहीशी करण्याचे सामर्थ्य आणि दुःखाचे देखणेपण पाहण्याची ताकद असल्या गाण्यातूनच मिळत असते !

पुणे, २ जून ७३

**—पु. ल. देशपांडे**

# पत्र : लता मंगेशकर

प्रिय सुरेश भट यांस सस्नेह नमस्कार.

'रंग माझा वेगळा' हा तुमचा कवितासंग्रह तुम्ही अगत्यपूर्वक मला वाचण्यासाठी दिला त्याबद्दल आभारी आहे. तुमच्या कविता वाचायला सुरुवात केली आणि एका बैठकीतच सगळा संग्रह मी वाचून काढला. तुमच्या कविता वाचताना सहज जे विचार मनात आले ते तुम्हाला लिहून कळवावेत असे वाटले; म्हणून हे पत्र लिहीत आहे.

तुमच्या कवितांमागे वेगवेगळ्या प्रेरणा आहेत. काही कविता देशात घडणाऱ्या राजकीय आणि सामाजिक संघर्षांच्या प्रसंगी लिहिल्या गेल्या आहेत. या कवितांमधून तुमच्या देशभक्तीचा, मायदेशाविषयीच्या, तुमच्या उत्कट भावनेचा आविष्कार झाला आहे. या कवितांतली '**उषःकाल होता होता काळरात्र झाली ! अरे पुन्हा आयुष्यांच्या पेटवा मशाली !**', ही कविता मला अतिशय आवडली. देश स्वतंत्र झाला, पण स्वातंत्र्याबरोबर आपली जी सुखस्वप्ने साकार व्हायला हवी होती ती तशी झाली नाहीत. उलट, स्वातंत्र्योत्तर काळामध्ये देशात अनेक दुष्ट प्रवृत्ती मोकाट सुटल्या आणि सामान्य माणूस साध्या सुखाला, साध्या आनंदालाही वंचित झाला. यामुळे संवेदनाक्षम कविमनात उसळलेला प्रक्षोभ या कवितेत अतिशय परिणामकारक रीतीने प्रकट झाला आहे. इथे तुमची चीड, तुमचे दुःख, तुमची वेदना अगदी अस्सलपणे जाणवते. आणि ती काळजाला जाऊन भिडते. या सुंदर कवितेबद्दल तुम्हाला द्यावेत तेवढे धन्यवाद थोडेच.

तुमच्या कवितासंग्रहातला दुसरा भाग आहे तो गीतांचा. मी कविता आवडीने वाचते. गीतांशी तर गाण्यामुळे हरघडी संबंध येतो. गीते वाचताना मला ती त्यातल्या काव्यकल्पनांमुळे जशी आकर्षून घेतात, तसे त्यात दडलेले 'गाणे'ही मला सारखे जाणवत राहते. 'वाजवि मुरली देवकिनंदन', 'आज गोकुळात रंग खेळतो हरी', 'सखि मी मज हरपुन बसले ग', 'मालवून टाक दीप चेतवून अंग अंग' ही तुमची गीते वाचताना मला त्यातले काव्य तर आवडलेच; पण त्यांची 'गेयता'ही मला हृदयंगम वाटली. काव्य आणि गीत यांना जोडणारा धागा गेयता हाच आहे. गीताची शब्दरचना निर्दोष असली, नादमधुर मृदू

व्यंजनांनी युक्त असली, त्यातले खटके योग्य जागी येत असले, यमके व्यवस्थित असली तर असे गीत चाल बसवण्याच्या दृष्टीने संगीतदिग्दर्शकाला प्रेरणा देते. आणि गायकालाही ते गीत गाताना मनाला मोठे समाधान वाटते. 'आज गोकुळात रंग खेळतो हरी', 'मेंदीच्या पानावर', 'मालवून टाक दीप चेतवून अंग अंग' ही तुमची गीते ध्वनिमुद्रिकेसाठी गाताना मला हे समाधान आणि हा आनंद फार मोठ्या प्रमाणात लाभला. चांगल्या गीताची माझ्या दृष्टीने एक कसोटी आहे. गीत इतके चांगले 'बांधलेले' असावे की ते 'बांधले' आहे हेही कुणाच्या ध्यानात येऊ नये. तुमची गीते रचनेच्या दृष्टीने इतकी देखणी व बांधेसूद आहेत की, ती या कसोटीला निश्चित उतरतात. गीत कोणते आणि काव्य कोणते, गीतकाराला कवी मानावे की नाही, या वादात माझ्यासारखीने पडू नये. **पण उत्तम गीत हे मुळात उत्तम काव्यही असावे लागते,** याबद्दल सहसा कुणाचा मतभेद होईल असे वाटत नाही. तसेच पाहिले तर ज्ञानदेवांसारख्या महाकवीची 'मोगरा फुलला', 'पैल तो गे काऊ कोकताहे', 'घनु वाजे घुणघुणु' किंवा 'रूप पहाता लोचनी' ही गीतेच आहेत ना ? पण त्यांतले काव्य अस्सल नाही असे कोण म्हणेल ? 'मालवून टाक दीप' हे तुमचे गीत उत्तम काव्य म्हणूनही तितकेच परिणामकारक आहे. 'बोल रे हळू, उठेल चांदण्यावरी तरंग' यासारखी त्या गीतातली नाजूक आणि रम्य कल्पना गीत गाऊन झाल्यावरही दीर्घकाळ माझ्या मनात तरळत राहिली.

तुमच्या या संग्रहातला सर्वात चांगला आणि सर्वात वैशिष्ट्यपूर्ण भाग आहे तो अर्थात गझल शैलीतील कवितांचा. तुमचे व्यक्तिमत्त्व, तुमच्या व्यथा, तुमच्या वेदना, जीवन जगताना तुम्हाला आलेले कटू अनुभव, या साऱ्यांचा अर्क तुमच्या गझलवजा कवितांत उतरला आहे. उर्दू कवींचे गझल तुम्ही मनःपूर्वक वाचले आहेत, इतकेच नव्हे तर गझलांची जी एक 'खासियत' असते ती तुम्ही स्वतःमध्ये उत्तम मुरवली आहे. एक प्रकारची बेहोषी, बेफिकिरी, जगाबद्दलची पूर्ण उपेक्षा, आपल्याच भावविश्वात रमून राहण्याची वृत्ती, तीव्र एकाकीपण, आणि अंतःकरणात सलत राहिलेल्या दुःखाची जिवापाड केलेली जपणूक—

**दुभंगून जातां जातां मी अभंग झालो !**
**चिरा चिरा जुळला माझा, आत दंग झालो !**
**किरण एक धरुनी हाती मी पुढे निघालो !**
**अन् असाच वणवणतांना मी मला मिळालो !**

**सर्व संग सुटले, माझा मीच संग झालो**

... ... ...

आता मजेने बोलतो भेटेल त्या दु:खासवे
सांभाळुनी घेती मला माझी इमानी आसवे !
... ... ...
केव्हातरी वाऱ्यावरी आयुष्य हाका मारिते
मीही असा भिक्षेकरी ज्याला न काही मागवे !

तुमच्या कवितांमधल्या काही कल्पना विलक्षण नाजुक आणि सुंदर आहेत. अशा कल्पना माझ्या कायमच्या ध्यानात राहून गेल्या आहेत !

मनांतल्या मनांत मी तुझ्यासमीप राहतो !
तुला न सांगता तुझा वसंत रोज पाहतो !
तसा न राहिला अता उदास एकटेपणा
तुझीच रूपपल्लवी जिथे तिथे करी खुणा
पहा कसा हवेत मी तुझ्यासवे सळाळतो !
... ... ...
अशीच येथली दया हवेत चांचपायची
अशीच जीवनास या पुन्हा क्षमा करायची.
... ... ...
असेच निर्मनुष्य मी जिथेतिथे असायचे
मनात सूर्य वेचुनी जनांत मावळायचे !
... ... ...
मग सुटेल मंद मंद वासंतिक पवन धुंद
माझे आयुष्य तुझ्या अंगणांत टपटपेल !

गझल म्हटल्यावर त्यातल्या भावनांचे हे स्वरूप प्रथम मनात उभे राहते. गझलेची ही विशिष्ट वृत्ती तुम्ही पूर्णपणे आत्मसात केली आहे. उर्दू गझल भरपूर वाचण्यात एक धोका असा होता की, तुमच्या कविता ह्या उर्दू किंवा फारसी गझलांचे नुसते अनुकरण होणेही शक्य होते. तथापि तुमच्या बाबतीत तसे ते झाले नाही. तुमच्या या प्रकारच्या कविता अगदी तुमच्या स्वतःच्याच आहेत. गझलवाचनामुळे तुमची विशिष्ट कविवृत्ती सिद्ध झाली असे म्हणण्यापेक्षा, मूळ तुमची मनोवृत्ती गझलच्या भावविश्वाशी मिळतीजुळती असल्यामुळे गझल शैलीतील कवितेचे माध्यम भावाविष्कारासाठी तुम्ही निवडले, असे म्हटल्यास ते अधिक बरोबर होईल. उर्दू गझल मीही पुष्कळ वाचले आहेत. म्हणूनच तुमच्या या कवितांचा अस्सलपणा मला सारखा जाणवत राहिला. त्यांतली वेदना सच्चेपणाने जिवाला भिडत राहिली.

तुमच्या या कवितांत सहसा एकही कविता अशी नाही की, ज्यातली एखादी तरी ओळ, एखादी तरी भावना, एखादी तरी कल्पना सतत स्मरणात राहत नाही ! अशा ओळी, भावना, कल्पना द्यायच्या म्हटल्या तर कितीतरी लिहावे लागेल. पण त्यातल्या त्यात काही ओळी लिहिल्याशिवाय मला राहवतच नाही :

**माणसांच्या मध्यरात्री हिंडणारा सूर्य मी**
**माझियासाठी न माझ्या पेटण्याचा सोहळा !**

... ... ...

**स्वप्न माझे भंगले अन् गीत माझे संपले**
**हाय ! बाजारांत माझा हुंदका आणू नका !**

'जन्माच्या वेळीचे सावध पान पान', 'कायांचा बंद कापूर', 'स्वप्नदेशी अनावर झालेली नीज' अशा कोमल आणि काव्यमय शब्दचित्रांचा ठसा मनावर एकदा उमटला की, तो कधी पुसून जात नाही.

तुमचा कवितासंग्रह वाचताना एक विचार राहून राहून मनात येत होता. काव्य असो की गाणे असो, त्यात बुद्धीच्या चपल आणि तल्लख विलासापेक्षा भावनेचा जिवंत जिव्हाळा हाच शेवटी आपल्या मनाला जाऊन भिडतो आणि नंतरही दीर्घकाळ तिथे रेंगाळत राहतो. मी अनेक कवींची काव्ये वाचली आहेत, आणि अनेक गायकांचे गाणेही ऐकले आहे. बौद्धिक चमत्कृतीची कसरत करून गायिलेले गाणे किंवा केवळ तल्लख बुद्धिविलास दाखवणारे काव्य हे रसिकाला चकित करते, स्तिमित करते, थक्क करते; पण जे गाणे किंवा जे काव्य कलावंताच्या हृदयातून उत्स्फूर्तपणे प्रकट होते, ते ऐकणाऱ्याच्या काळजाचा ठाव घेते. त्यात भपका नसेल, डामडौल नसेल, ऐट नसेल; पण त्यातली उत्कटता, सरलता आणि प्रांजळपणा हा सरळ आपल्या हृदयात प्रवेश करतो. आपल्या संतकवींचे कितीतरी काव्य असे उत्कट आणि हृदयस्पर्शी आहे. आपल्या बालकवींच्या काव्यात हे साधेपणाचे सौंदर्य होते. उर्दू कवींमध्ये मीर हा याच प्रकारचा कवी होऊन गेला. गायनाच्या संदर्भात बोलायचे झाले तर आपल्याकडच्या शास्त्रीय गायकांमध्ये बडे गुलाम अलीखांसाहेब यांच्या गाण्यात हा भावनेचा जिव्हाळा होता. चित्रपट संगीत गाणाऱ्या कलावंतांमध्ये सहगल हा या जातीचा कलावंत होता. त्याच्यापाशी डोळे दिपवणारी बौद्धिक चमत्कृती नव्हती; पण तो जे गाई ते रसिकांच्या हृदयाचा तात्काळ वेध घेई. तुमच्या कवितेबद्दल मला हेच म्हणावेसे वाटते. ह्या कविता वाचताना त्यांतल्या दुःखाची, वेदनेची कळ ही वाचकालाही जाणवण्याइतकी निश्चित प्रभावी आहे. ह्या कवितांत बुद्धीला दिपविणारे चमत्कार नसतील; पण भावनेचा जिवंत जिव्हाळा, मनाचा निर्मळ प्रांजळपणा त्यात खचित आहे. आणि त्याचे मोल फार मोठे आहे.

असो. पत्र लांबले. पण तुम्ही ज्या स्नेहभावनेने तुमचा कवितासंग्रह मला वाचायला दिला, त्याच मनमोकळेपणाने मी हा संग्रह वाचताना जे जें काही मला जाणवले ते तुम्हाला लिहून कळवले आहे. आज प्रसिद्ध होणाऱ्या मराठी कवितासंग्रहामध्ये तुमचा हा संग्रह आपल्या स्वतंत्र वैशिष्ट्यामुळे निश्चित ठळकपणाने उठून दिसेल. त्याचा 'रंग वेगळा' आहे हे तर खरेच; पण तो रंग अस्सलही आहे. कारण, तुमच्या हृदयातले रक्त त्यात मिसळलेले आहे !

७–११–७२ —लता मंगेशकर

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| प्रास्ताविक : पु. ल. देशपांडे | तीन |
| पत्र : लता मंगेशकर | दहा |
| अर्पण | १ |
| तनमन अमृत बनते ग | २ |
| व्यर्थ | ३ |
| एवढे दे पांडुरंगा ! | ४ |
| साकडे | ५ |
| कल्हई | ६ |
| भविष्य | ७ |
| हात | ८ |
| भेट | ८ |
| तू | ९ |
| तंद्री | १० |
| हारपली ओळ | १० |
| चल ऊठ रे मुकुंदा | ११ |
| गीतगंगेच्या तटावर | १२ |
| मुद्दल | १३ |
| सर्वज्ञ | १३ |
| नव–महाराष्ट्रगीत | १४ |
| तुकारामाला | १५ |
| हरवले आयुष्य माझे | १६ |
| राख | १६ |
| मुरली | १७ |
| ते | १८ |
| टिचक्या | १८ |
| मागता न आले म्हणुनी | १९ |
| वीट | २० |
| एकतारी | २० |
| दिवंगताचे गीत | २१ |
| जयगान | २२ |
| गौळण | २४ |
| रोज | २४ |
| एक कैफियत | २५ |
| हासताना प्राण गेला | २६ |
| मग | २७ |
| एक चिंतनिका | २८ |
| एकटा | २९ |
| एक साधा प्रश्न माझा | ३० |
| समुद्र अंतरांतला | ३१ |
| माझी उदास गीते | ३२ |
| पायपीट | ३२ |
| दिवस हे जाती कसे | ३३ |
| उषःकाल होता होता | ३४ |
| गीते का कधी व्यर्थ असतात ? | ३५ |
| रंग खेळतो हरी | ३६ |
| मालवून टाक दीप | ३७ |
| इंद्रजाल | ३८ |
| प्रार्थना | ३९ |
| कलंदराचे गीत | ४० |
| मनातल्या मनात मी | ४१ |
| माझा वऱ्हाड | ४२ |
| आज मी जे गीत गातो | ४२ |
| जगत मी आलो असा | ४३ |
| गेलो निघून दूर | ४४ |

| | | | |
|---|---|---|---|
| दुभंगून जाता जाता | ४५ | पहाटे पहाटे | ६२ |
| तसा मी राहिलो नाही ! | ४६ | कॉकटेल | ६३ |
| कवाडे | ४६ | स्वगत | ६४ |
| पालखी | ४७ | ने मला | ६५ |
| समजावता न आले | ४८ | प्राणाच्या बासरीत | ६६ |
| विसरून जा ! | ४९ | वचन | ६७ |
| असेच्च हे | ५० | सांजवेळ | ६८ |
| गाण्याची कहाणी | ५१ | भ्रम | ६८ |
| ऋणे | ५१ | मी निघालो | ६९ |
| रंग माझा वेगळा | ५२ | आम्ही जिवंत राहू ! | ७० |
| अनोळखी | ५३ | आसवांनो ! | ७१ |
| उपदेश | ५४ | बोल माझ्या फुला ! | ७२ |
| सूर | ५५ | कौल मागत राहिलो ! | ७३ |
| गे मायभू | ५६ | मजेत मी ! | ७४ |
| आता मजेने बोलतो | ५७ | आजकाल | ७५ |
| सवय मला झाली | ५८ | गोळाबेरीज | ७६ |
| विजय | ५९ | चकवा | ७७ |
| व्यवहार | ६० | चांदण्यात फिरताना | ७८ |
| तरुण आहे रात्र अजूनी | ६१ | कळते रे ! | ७९ |
| विपरीता | ६१ | सजण दारी उभा ! | ८० |

# अर्पण

साधीसुधी ही माणसे
माझ्या कवित्वाची धनी;
ह्यांच्यात मी पाही तुक्या,
ह्यांच्यात नाम्याची जनी.

ह्यांचीच स्वप्ने भाबडी
शब्दांतुनी मी वेचतो;
ह्यांच्या भविष्याची नभे
माझ्या उरी सांभाळतो.

ते हेच मी ज्यांच्यामुळे
भाषा मराठी बोलतो;
माझा खरेखोटेपणा
ह्यांनाच आता अर्पतो.

# तनमन अमृत बनते ग

अमृतमय मी, अमृतमय तू, तनमन अमृत बनते ग;
अमृतमय श्वासात आपुल्या अमृतनभ थरथरते ग !

अमृतमय मौनातच रिमझिम रिमझिमती अमृतधारा;
भिजते माझे अंगअंग, पण अंग तुझेही भिजते ग !

रुधिरातिल कल्लोळ हावरा रुधिरातच फिरला . विरला;
एकच इवले कातर स्पंदन अंतरात किलबिलते ग !

आत्म्याच्या चांदण्यात अपुल्या हुरहुरत्या हाका घुमती;
जन्माच्या वेलीचे सावध पानपान सळसळते ग !

कायांचा कापूर वंद पण दरवळ बघ तरळत उठला;
स्पर्शाविण स्पर्शाचे वादळ धमन्यातुन भिरभिरते ग !

प्राणाच्याही पार आपुल्या कुठेतरी भेटी घडती,
गडे, मला हे जाणवते अन् तुजलादेखिल कळते ग !

स्वप्नफुलांनी आज शिगोशिग डोळ्यांची परडी भरली :
तुझी नव्हाळी, माझी तगमग . . कोण कुणाला खुडते ग ?

## व्यर्थ

सूर मागू तुला मी कसा ?
जीवना तू तसा, मी असा !

तू मला, मी तुला पाहिले,
एकमेकांस न्याहाळिले;
—दुःख माझातुझा आरसा !

एकदाही मनासारखा
तू न झालास माझा सखा;
—खेळलो खेळ झाला जसा !

खूप झाले तुझे बोलणे,
खूप झाले तुझे कोपणे;
—मी तरीही जसाच्या तसा !

रंग सारे तुझे झेलुनी,
शाप सारे तुझे घेउनी
—हिंडतो मीच वेडापिसा !

काय मागून काही मिळे ?
का तुला गीत माझे कळे ?
—व्यर्थ हा अमृताचा वसा !

## एवढे दे पांडुरंगा !

माझिया गीतांत वेडे
दु:ख संतांचे भिनावे;
वाळल्या वेलीस माझ्या
अमृताचे फूल यावे !

आशयांच्या अंबरांनी
टंच माझा शब्द व्हावा;
कोरडा माझा उमाळा
रोज माधुर्यात न्हावा !

स्पंदने ज्ञानेश्वराची
माझिया वक्षांत व्हावी;
इंद्रियांवाचून मीही
इंद्रिये भोगून ध्यावी !

एकनाथाने मलाही
बैसवावे पंगतीला;
नामयाहाती बनावे
हे जिणे गोपाळकाला !

माझियासाठी जगाचे
रोज जाते घर्घरावे;
मात्र मी सोशीन जे जे
ते जनाईचे असावे !

मी तुक्याच्या लोचनांनी
गांजल्यांसाठी रडावे;
चोख वेव्हारात माझ्या
मी मला वाटून द्यावे !

ह्याविना काही नको रे,
एवढे दे पांडुरंगा !
ह्याचसाठी मांडिला हा
मी तुझ्या दारात दंगा !

## साकडे

तुझ्या स्निग्ध प्रकाशाने
वाट प्रत्येक उजळे,
मात्र चालणारे होती
पाय असून पांगळे.

तुझ्या मधुर हाकांनी
दाही दिशा झंकारती;
फक्त करंटेच तुला
पाय असून सोडती.

ज्याच्या त्याच्या हृदयात
तुझे डोकावे रूपडे;
हाय ! डोळस आंधळे
तुला घालिती साकडे !

# कल्हई

कधी आकाशगंगेच्या
दिव्य जळात डुंबलो
कधी नक्षत्रवनात
मनसोक्त भटकलो

कधी फुलांत टिपले
माझे दवारले गाणे
कधी कोवळ्या उन्हात
प्यालो तुडुंब चांदणे

कधी इंद्रधनुष्यांची
झाली स्पंदने उरात;
कधी गंधांची निघाली
गात्रागात्रात वरात;

हाय ! तरीही बाजारी
माझी तोकडी पुण्याई :
नाही अजून 'तेवढी'
माझ्या शब्दांना कल्हई !

# भविष्य

ताठ कॉलरींचा ताठा वाकणार आहे !
वंचनाच ज्याची त्याला गाडणार आहे !

मूटमूठ हृदये ज्यांची, तसूतसू दुःखे,
शून्य काय त्यांचे त्यांना गवसणार आहे ?

तलम माणसांनी ध्याव्या कागदी भराऱ्या !
उद्या वाळवी साऱ्यांना लागणार आहे

तशी बरी सोयीसाठी साळसूद सत्ये !
तसा कोण वीज उराशी लावणार आहे ?

खुराड्यात रचती जे जे षंढ दंभगाथा
का तयांस इंद्रायणि ही तारणार आहे ?

जरी बीळ बीळ कराया पाहते मुजोरी,
उद्या श्रेय ज्याचे त्याला लाभणार आहे !

गटारात खुपसुन मान सूर्य शोधिती जे
गगन का तयांचे मिंधे राहणार आहे ?

मठोमठी मंत्राजींना कीर्तने करू द्या;
विठू काय बेमानांना पावणार आहे ?

## हात

रूपकैफी प्रत्ययांचा गलबला प्राणात झाला !
स्पर्शकल्लोळात माझा जन्म एकाकी बुडाला !

कोरिली होतीस जी तू माझिया वक्षांत गीते,
आज आपोआप त्यांना कंठ आभाळी मिळाला !

हे पुन्हा माझे विरागी रक्त गंधाळून गेले...
लाल ओठांच्या पहाटे सूर्य दंशाचा निघाला !

कालच्या स्वप्नास आली आज सोन्याची झळाळी,
गाढ तेजाबी मिठीची लागुनी एकांतज्वाला !

संपली येथेच माझी स्वप्नभूमीतील यात्रा !
माझिया हाती कुणाचा तोच गोरा हात आला ?

## भेट

थकताच नेत्र जेथे
तेथेच भेटशी तू !
सरतात अर्थ जेव्हा
तेव्हाच बोलशी तू !

# तू

तू माझ्या आयुष्याची पहाट
तू माझ्या कैफाची मत्त लाट

तू मागिल जन्मांची आर्त साद
तू मानसकुंजातील वेणुनाद

तू माझ्या एकांताचा प्रकाश
तू माझ्या गीतांचा बाहुपाश

तू माझ्या दुःखांची चांदरात
तू माझ्या स्वप्नांचा पारिजात

तू अमृतभासांचा अंगराग
तू विझल्या देहाचा दीपराग

तू माझ्या जगण्याची वाटचाल
तू माझ्या रक्ताचा रंग लाल

तू माझ्या असण्याचा अंशअंश
तू माझ्या नसण्याचा मधुर दंश

## तंद्री

लाजुनी झाले गुलाबी दुःख माझे देखणे;
ही तुझी श्वासांत आली लाघवी आमंत्रणे !

तू पुन्हा आलीस माझ्या पोळल्या ओठांवरी
बांधुनी बेचैन माझ्या स्पंदनांची पैंजणे !

रोमरोमांतून गात्रांतून माझ्या चालली
सारखी लाडावलेली आपुली संभाषणे !

हासती तंद्रीत माझ्या आर्जवी डोळे तुझे
आज एकांतात बोले पूर्णिमेचे चांदणे !

## हारपली ओळ

पुन्हा माझ्या स्पंदनांची झाली फुलेफुले;
पुन्हा माझ्या अंतरांत मत्त नभ झुले.
झगमगे तारुण्याची पुन्हा दीपमाळ;
पुन्हा माझ्या प्राणावर चंद्रबिंब कले.

आज माझा श्वासश्वास सुगंधकल्लोळ,
आज माझा शब्दशब्द प्रकाशाचा लोळ.
विसराळू आयुष्याला पुन्हा सापडली
तुझ्यामाझ्या कवितेची हारपली ओळ.

## चल ऊठ रे मुकुंदा

चल ऊठ रे मुकुंदा, झाली पहाट झाली !
बाहेर चांदण्याला हलकेच जाग आली !

मंदावला कधीचा
गगनात शुक्रतारा
अन् चोरपावलांनी
आला पहाटवारा
गालांवरी उषेच्या आली हळूच लाली !

घे आवरून आता
स्वप्नांतला पसारा
बेचैन गोकुळाने
केला तुझा पुकारा
तव गीत गात सारी ही पाखरे उडाली !

तुज दूर हाक मारी
कालिंदिचा किनारा
कुंजांतल्या फुलांनी
केला तुला इशारा
तुज शोधण्यास वेडी राधा पुन्हा निघाली !

# गीतगंगेच्या तटावर

गीतगंगेच्या तटावर ये तुझी घेऊन घागर !
हुंदका दाबून माझा वाट मी पाहीन तोवर !

ये गडे, तू पूर्णिमेचे चांदणे वेणीत माळुन,
आर्त अश्रिंच्या आठवांची आरती हृदयात घेउन,
हरवलेले क्षण सुगंधित आपुल्या पदरात बांधुन

सांग, कुठल्या स्वप्नदेशी नीज तुज आली अनावर ?

ठेवली आहेस का तू अजुन माझी रिक्त ओंजळ ?
भग्नशिल्पासारखे हे बैसले आयुष्य निश्चळ.
मौन अस्थाईत माझ्या अमृतासम तू उचंबळ !

आंधळ्या माझ्या व्यथेचा तोल तू लाजून सावर !

एक शिणलेला प्रवासी मागतो आहे दिलासा ।
भिजव तू लाटात इथल्या प्राण माझाही जरासा !
चार थेंबांनी विझेना सात जन्मांची पिपासा !

मालकंसाच्या स्वरांनी मिटव दोघांतील अंतर !

## मुद्दल

मन मारून आपुले
जगण्याशी सौदा केला !
मला विकाया काढून
माझा आत्मा गुंडाळला !

मग परीटघड्यांचा
समाधानला बाजार :
"गरुडाला समजला
गांडुळांचा व्यवहार !"

आज ताळा काढताना
झाला शेवटी उकल :
सौदा साधता बुडाले
माझे मूळचे मुद्दल.

## सर्वज्ञ

असते ज्यांचे हृदय बँकेत सुरक्षित,
इन्क्रिमेंट आणि प्रमोशन
बांझेच्या विटाळासारखे निश्चित;
त्यांना सर्वच असते माहीत....
कविताही !

# नव महाराष्ट्रगीत

बदलवून टाकू अपुला महाराष्ट्र सारा !
वर्षवू इथे आमच्या अहोरात्र धारा !

ह्याच कातळांना आणू
कळा सोनियाची
ह्याच माळरानी काढू
पिके मोतियांची
भुकेल्यास भाकर देऊ, अनाथा निवारा !

चालवून गिरणीमधला
एकएक साचा
अम्ही पुन्हा हाती घेऊ
हात भविष्याचा
उद्याच्या यशाने केला आमुचा पुकारा !

अम्हावरी खिळले डोळे
उद्याच्या पिढ्यांचे
आज स्वप्न बघतो आम्ही
उद्याच्या दिसाचे
आता कुठे इतिहासाचा समजलो इशारा !

माय कोयनेची माया
बळ अम्हांस देई
गावगाव गहिवरलेले
तिचे नाम घेई
मराठी घरेला फुटला विजांचा धुमारा

घरोघरी स्वातंत्र्याचा
पांडुरंग आला
महाराष्ट्र भेटीसाठी
पुंडलीक झाला
विटेवरी आम्ही ठेवू जागता पहारा !

## तुकारामाला

तुझे दुःख तुझे नाही !
तुझे दुःख आमचे आहे !

अजून त्याच्या डोळियांनी
आम्ही प्रत्यय पारखत आहोत !
अजून त्याच्या प्रकाशात
आम्ही शब्द वेचत आहोत !
अजून त्याच्या सोबतीने
आम्ही वाट चालत आहोत !

तुझे दुःख तुझे नाही....

# हरवले आयुष्य माझे

हरवले आयुष्ये माझे; राहिले हे भास !
झगमगे शून्यात माझी आंधळी आरास !

उधळते आकाश माझी करपलेली धूळ;
फसवुनी गेला मला क्षणभेटला मधुमास !

दूर.. काळोखात माझे विव्हळती आवाज...
तुडवितो माझ्या दिशांचा मज इथे उपहास !

व्यर्थ हा रसरूपगंधांचा तुझा अभिसार;
वेच तू वाऱ्यावरी माझे अभागी श्वास !

# राख

उभा जन्म झाला चिता :
एक एक क्षण ज्वाला;
सुन्न मनाच्या स्मशानी
मला भडाग्नि मी दिला !

गडे, तरीही सोडीना
इथे मला तुझी आस;
माझ्या राखेलाही येई
तुझ्या रूपाचा सुवास !

## मुरली

वाजवि मुरली देवकिनंदन;
कान जिवाचे करि वृंदावन

मुकुट फुलांचा शिरी घालुनी,
मोरपिसाचा तुरा खोवुनी,
दिला पुन्हा 'हिंदोल' छेडुनी :

रागरागिण्या झाल्या पावन.

अमृतकोमल स्वरलहरींवर
हेलावे पुनवेचे अंबर,
स्वर्गधरेतिल मिटवुन अंतर

दिशादिशांतुन उमले गुंजन.

भ्रमरांचे रसपान थांबले,
यमुनेचे जळ जवळ सरकले
अन् राधेचे मीपण सरले

....अंग अंग बनले मनमोहन.

## ते

त्या वेळी
तू आलास
आणि म्हणालास,
" एकमेकांवर प्रेम करा ! "

त्यांनी तुला क्रूसावर खिळले !

मग
शतकांचा अंधार ओलांडून
पुन्हा आलास सूर्यकिरणांतून
आणि म्हणालास,
" सबको सम्मति दे भगवान ! "

त्यांनी तुझ्यावर गोळ्या झाडल्या !

## टिचक्या

नगरोनगरी गावोगावी
हिंडे माझे श्रांत कलेवर;
मधुन मारते हळूच टिचक्या
ह्या दारावर, त्या दारावर
दारावर....

# मागता न आले म्हणुनी

मागता न आले म्हणुनी
राहिलो भिकारी !
लागली न वर्णी माझी
कोणत्याच दारी !

भाग्यवान लाचारांना
दिसे मीच नंगा;
घेऊनी न झोळी आलो
म्हणुन मी लफंगा !

तशी जरी दातारांची
मानतो भलाई,
फाटक्या खिशाला माझ्या
बोचते कमाई !

आसवांत माझी अर्धी
भाकरी बुडाली;
सोसण्यात उरलीसुरली
भूक शांत झाली !

## वीट

आज पुन्हा जागा झाला
एक मनीचा अभंग
श्वासांचिया टाळांसवे
घुमे प्राणाचा मृदंग.

अठ्ठावीस युगांतली
पापे धन्य धन्य झाली;
झाला पांडुरंग वीट
माझ्या पंगु पायांखाली.

## एकतारी

एकदा भेटून जा रे
दिव्यतेच्या पांडुरंगा !
हुरहुरे प्राणांत माझ्या
वेदनेची चंद्रभागा.

तूच ये घेऊन दिंडी,
होउ दे माझीच वारी;
ताणली ताणापुढे मी
जीवनाची एकतारी !

# दिवंगताचे गीत

जिवंत माझ्या कलेवराला अजून आयुष्य हाक मारी !
कशास एका भिकारड्याला पुकारतो हा दुजा भिकारी ?

भिकेत आणून आस तेव्हा प्रतारणांचा प्रपंच केला;
आता दुवा देत देत माझी जिथे तिथे हिंडते शिसारी !

कशी करू सांत्वने कुणाची ? अजून अश्रू कितीक झेलू ?
पिढ्यापिढ्यांच्या मनोगतांचा कसा बनू एकटा फुलारी ?

मिळेल त्या तोतया क्षणाशी जमेल तो डाव मांडिला मी;
अजूनही स्वप्नद्यूत चाले : अजून हा मी असा जुगारी !

बसून खोटारड्यांत मीही करू कशी अन्नुदार पापे ?
कळे न माझ्यामधून होऊ कधी, कसा अन् कुठे फरारी ?

दुभंगलेल्या उरात माझ्या किती किती सूर्य झोप घेती;
चुकून हे रक्त पेटण्याची कधीमधी दाखवी तयारी !

असंख्य माझ्या पराभवांचे चिणून मी टाकिले इरादे;
मध्येच मी बंडखोर गीते उफाळुनी फुंकिती तुतारी !

उगीच एका दिवंगताने करू नये एवढी अपेक्षा....
असा कसा हा वसंत येई पुन्हा माझियाच दारी ?

## जयगान

जय जन्मभू ! जय पुण्यभू ! जय स्वर्गभू सुखदायिनी !
जय धर्मभू ! जय कर्मभू ! जय वीरभू जयशालिनी !

उधळून प्राणांची फुले
महाराष्ट्र तुज मुजरा करी !
वाहून तनमनधन तुला
पंजाब चरणांना धरी;
गाई यशोगीते तुझी
वंगीय अमृतवैखरी;
गंगेचिया लाटांतुनी उठती तुझे नामध्वनी !

गुजरातच्या नेत्री तुझी
धावून येती आसवे;
बघ, हृदय आंध्राचे जळे
जननी, तुझ्या हृदयासवे;
रक्तास राजस्थानच्या
तुजहून दूर न राहवे;
तामीळनाडाच्या उरी आला उमाळा दाटुनी !

कर्नाट, केरळ, ओरिसा—
सारेच छावे जागती;
आसामच्या गिरिकंदरी
वणवे मनांचे हिंडती;
काश्मीरच्या छातीतुनी
जखमा तुझ्या बघ वाहती !
जय कोटिजनगणमानिनी ! जय सकलमानसमोहिनी !

एकेक इथला कण म्हणे
“ जय जय सचेत महानता ! ”
हे गगनमंडल गुंजते,
“ जय एकता ! जय एकता ! ”
उसळून सागर गर्जतो,
“ जय भारतीय स्वतंत्रता ! ”
अंधारल्या जगतामध्ये झळके तुझी सौदामिनी !

तू सुप्त स्वर कंठातले,
तू श्वास माझा एकला,
तू स्पंदने हृदयांतली,
तू रक्तिमा रक्तांतला;
नाही बरे माझा तुझा
आई जिव्हाळा संपला !
साध्यासुध्या शब्दांत ह्या तू ओतिली मंदाकिनी !
जय जन्मभू ! जय पुण्यभू ! जय स्वर्गभू सुखदायिनी !

## गौळण

सखि, मी मज हरपुन बसलेऽ ग

आज पहाटे श्रीरंगाने मजला पुरते लुटलेऽ ग
साखरझोपेमध्येच अलगत प्राजक्तासम टिपलेऽ ग
त्या श्वासांनी दीपकळीगत पळभर मी थरथरलेऽ ग
त्या स्पर्शाच्या हिंदोळ्यावर लाजत उमलत झुललेऽ ग
त्या घनश्यामल मिठीत नकळत बिजलीसम लखलखलेऽ ग
दिसला मग तो देवकिनंदन अन् मी डोळे मिटलेऽ ग

सखि, मी मज हरपुन बसलेऽ ग

## रोज

गात्रागात्राला फुटल्या
तुझ्या लावण्याच्या कळ्या;
जन्म वेढून बांधिती
तुझ्या भासांच्या साखळ्या !

रोज तुझ्या वेणीसाठी
डोळे नक्षत्रे खुडती;
रोज तुझ्या भेटीसाठी
बाहू आसवांचे होती !

## एक कैफियत

रोखली संगीन छातीला रुते,
गारदी घेऊन आले शृंखला
लाथही कोणी बुटाची हाणली
अन् मला माझा सुगावा लागला !

बाजुच्या दारातुनी डोकावती
ओळखीचे चेहरे घाणेरडे;
हालती पालीपरी काही जिभा :
सारखी माझ्यावरी थुंकी उडे !

थंड नेत्रांनी तटस्थासारख्या
येथल्या भिंती मला न्याहाळती;
मात्र मी काढून छाती बोलतो
शब्द जे ओठांवरी ओठंगती !

कातडी सांभाळुनी आपापली
दूर झाल्या सोबत्यांच्या इभ्रती :
सोयरे सारेच सोयीचे घरी
भाकिते माझी चुलीला सांगती.

काल ह्या गल्लीत आयुष्यासवे
गीत माझे झुंजले अन् हारले !
नागवी अद्यापही माझी घृणा;
मी कुठे हत्यार खाली टाकले ?

# हासतांना प्राण गेला

हासताना प्राण गेला का तुला आले रडे ?
हे पहा हे लोक सारे कोरडेच्या कोरडे !

का अशी मागून ही
ढाळशी तू आसवे ?
संपलो केव्हाच मी
त्या तुझ्या स्वप्नासवे.
तारकांनाही न आता खूण माझी सापडे !

तू असा छेडू नको
अंतरीचा जोगिया;
हो चिता माझी पुन्हा
लागली जागावया.
ही पहा ही राख माझी वारियासंगे उडे !

एकदा नेत्री तुझ्या
चांदणे मी वेचले;
एकदा ओठी तुझ्या
गीत माझे गुंफिले.
आज अस्थाईच माझी अंतऱ्यापाशी अडे !

# मग

मग माझा जीव तुझ्या वाटेवर वणवणेल !
अन् माझी हाक तुझ्या अंतरात हुरहुरेल !

मी फिरेन दूर दूर
तुझिया स्वप्नांत चूर;
तिकडे पाऊल तुझे उंबऱ्यात अडखळेल !

विसरशील सर्व सर्व
आपुले रोमांचपर्व
पण माझे नाव तुझ्या ओठांवर हुळहुळेल !

सहज कधी तू घरात
लावशील सांजवात;
माझेही मन तिथेच ज्योतीसह थरथरेल !

जेव्हा तू नाहशील,
दर्पणात पाहशील,
माझे अस्तित्व तुझ्या आसपास दरवळेल !

जेव्हा रात्री कुशीत
माझे घेशील गीत,
माझे तारुण्य तुझ्या गात्रांतुन गुणगुणेल !

मग सुटेल मंद मंद
वासंतिक पवन धुंद;
माझे आयुष्य तुझ्या अंगणात टपटपेल !

## एक चिंतनिका

मी पडलो आहे असाच रस्त्यावरती
लावीत कालचा हिशेब झालागेला,
पण अजूनदेखिल मला उमगले नाही :
" हा रस्ता येथे कसा कोठुनी आला ? "

मधुनीच थबकतो वाटसरू एखादा
निरखिण्या चेहरा माझा हा नसणारा.
...वळवळती माझी हडाडलेली बोटे
अन् खपाटलेले पोट पीतसे वारा !

कधि भरून येई आषाढी आकाश;
कधि उजाड होई सभोवारचा माळ;
मधुनीच वरळते पेंगत इथली धूळ,
" हा सरता सरता सरून जाइल काळ ! "

लाभताच मजला चुकूनही एकान्त
दडदुडती हृदयी अंधाराची पोरे;
उडवीत लक्तरे माझ्या अस्तित्वाची
धावते झळाळत झपाटलेले वारे !

मधुनीच होतसे कुजबुज माझ्याभवती :
" आयुष्य दडविले ह्याने केवळ वाया ! "
मधुनीच पुटपुटे समोर वठला निंब :
ह्याचीच सावली उठली ह्यास गिळाया ! "

सावरीत अपुल्या भुरभुरणाऱ्या झिंज्या
किंचाळत येती माझी जखमी गाणी;

मग उगीच माझ्या थरथरणाऱ्या ओठी
कडमडते माझी जुनाट रामकहाणी !

पण दूर पुकारा करी एक दरवेशी :
" उद्धरेल तुजला तुझे पुराणे पाप !
मागील पिढ्यांची दुःखे वाहुन थकला
तो तुझा थेरडा आकाशातिल बाप ! "

## एकटा

एकटा माझ्यासवे मी बोलतो,
एकटा माझा मला मी ऐकतो.

माझियावाचून माझे बोलणे
चाचपोनी शोधणे अन् ऐकणे

हा असा संवाद माझा चालतो.

मी असा—ज्याला सुखाने सोडले,
मी असा—ज्याला व्यथेने टाकले;

आपुले होकार मी नाकारतो.

एकटा मस्तीत मी माझ्या झुले
एकटा माझीच मी होतो फुले;

मी मला माझ्यात आता वेचतो.

# एक साधा प्रश्न माझा

एक साधा प्रश्न माझा, लाख येती उत्तरे !
हे खरे की ते खरे की ते खरे की ते खरे ?

कारणावाचून माझा शोध घेती कारणे
अन् कुणा ठावे मला मी विस्मरे किंवा स्मरे ?

भोवताली हिंडती ही माणसे प्रेतांपरी;
काय ह्या गावातसुद्धा एकदा होती घरे ?

जाळुनी आयुष्य माझे वाट मी तेजाळली;
फक्त माझे पोट आता जाळण्यासाठी उरे !

दूर आलो एवढा की थांबल्या मागे दिशा..
माझियासंगे उद्याची चालती संवत्सरे !

ह्याच आता शेष माझ्या राहिल्या काही खुणा :
दोन माझी आसवे अन् चार माझी अक्षरे !

# समुद्र अंतरातला

समुद्र अंतरातला कधी कधी उचंबळे !
कितीक काळ लोटला....मला न तीर आढळे !

अजून आसपास का
मुकेच शब्द हिंडती ?
अशा विराट जाणिवा
वृथाच का तुडुंबती ?
मधून माझियावरी तुषार मात्र आदळे !

अजूनही कधी कधी
चुकून श्वास चालतो !
अजूनही कधी मला
दुरून मी खुणावतो !
अजून अर्थ नेमका मला न आपुला कळे !

सुनेपणात माझिया
उठे मधून गलबला !
अनोळखी असून मी
मधून ओळखी मला !
असंख्य चेहऱ्यात मी मला तटस्थ न्याहाळे !

तसा अजून ऐकतो
कुठे कुठे उजाडले,
तशी किती ऋतूतल्या
स्वरात गुंफितो फुले;
कळे न हेच कोणत्या ऋतुस्वरात मी ढळे !

## माझी उदास गीते

माझी उदास गीते तू ऐकतोस का रे ?
अन् आसवांत माझ्या तू नाहतोस का रे ?

येताच तू समोरी मी दर्वळून जाते
माझ्यासमान तूही गंधाळतोस का रे ?

माझ्या मुक्या मनाच्या का छेडतोस तारा ?
माझ्यासवेच तूही झंकारतोस का रे ?

एकांत जीवनाचा अंधारला असू दे !
तू अंतरात माझ्या तेजाळतोस का रे ?

## पायपीट

दुःखाच्या वाटेवर
गाव तुझे लागले;
थबकले न पाय तरी
हृदय मात्र थांबले !

वेशीपाशी उदास
हाक तुझी भेटली
अन् माझी पायपीट
डोळ्यांतुन सांडली.

# दिवस हे जाती कसे

दिवस हे जाती कसे अन् ऋतु असे छळतात का ?
विसरतो आहे तुला पण आसवे ढळतात का ?

निसटुनी आयुष्य गेले त्या तुझ्या पदरासवे....
पण मुक्या रक्तात सारे अर्थ मग जुळतात का ?

जवळ तू नाहीस...उरली एकटी माझी मिठी;
चुकुन तव निःश्वास गाली माझिया रुळतात का ?

बिलगुनी बसली तुझी ही मधुरविव्हल चिंतने !
चांदण्या रात्री नकोशा टाळुनी टळतात का ?

रोज वासंतिक तुझे मी शब्द....स्वर नाकारितो,
अन् तुझी गीते तरीही मजकडे वळतात का ?

मी कधी म्हटले, "तुझी मज चरणचिन्हे भेटली !"
पण सुन्या डोळ्यांत माझ्या दशदिशा चळतात का ?

कुंद ह्या वेळी तुझ्याविण प्राण बघ मंदावला ..
मग असे भवती अचानक दीप हे जळतात का ?

जर तुझा एकांत केव्हा गुणगुणाया लागला,
शोध तू हृदयात....माझी स्पंदने मिळतात का ?

# उषःकाल होता होता

उष:काल होता होता काळरात्र झाली !
अरे, पुन्हा आयुष्यांच्या पेटवा मशाली !

आम्ही चार किरणांचीही
आस कां धरावी ?
जे कधीच नव्हते त्याची
वाट कां पहावी ?
कसा सूर्य अंधाराच्या वाहतो पखाली !

तेच घाव करिती फिरुनी
ह्या नव्या कट्यारी;
तेच दंश करिती आम्हा
साप हे विषारी !
अम्ही मात्र ऐकत असतो आमुची खुशाली ?

तिजोऱ्यांत केले त्यांनी
बंद स्वर्ग साती,
अम्हांवरी संसाराची
उडे धूळमाती !
आम्ही ती स्मशाने ज्यांना प्रेतही न वाली !

अशा कशा ज्याने त्याने
गाडल्या उमेदी ?
असा कसा जो तो येथे
होतसे खरेदी ?
ह्या अपार दु:खाचीही चालली दलाली !

उभा देश झाला आता
एक बंदिशाला,
जिथे देवकीचा पान्हा
दुधाने जळाला !

कसे पुण्य दुर्दैवी अन् पाप भाग्यशाली !

धुमसतात अजुनी विझल्या
चितांचे निखारे !
अजुन रक्त मागत उठती
वधस्तंभ सारे !

आसवेच स्वातंत्र्याची अम्हाला मिळाली !

## गीते का कधी व्यर्थ असतात ?

अहो, दूर गेलेल्या अज्ञात यात्रिकांनो,
पहा !
अजून उद्दाम आशेची जिद्द
जिवंत आहे !
अजून सत्याचे तारुण्य
उमलत आहे !
आहे अजूनही वसंताची ईर्षा
अपराजेय !

गीते का कधी व्यर्थ असतात ?

# रंग खेळतो हरी

आज गोकुळात रंग खेळतो हरी;
राधिके, जरा जपून जा तुझ्या घरी !

तो चटोर चित्तचोर वाट रोखतो,
हात ओढुनी खुशाल रंग टाकतो
रंगवून रंगुनी गुलाल फासतो...

सांगते अजूनही तुला परोपरी !

सांग श्यामसुंदरास काय जाहले ?
रंग टाकल्याविना कुणा न सोडले :
ज्यास त्यास रंग रंग रंग लागले !

एकटीच वाचशील काय तू तरी !

त्या तिथे अनंगरंगरास रंगला :
गोपगोपिकांसवे मुकुंद दंगला;
तो पहा मृदंग मंजिऱ्यांत वाजला...

हाय ! वाजली फिरून तीच बासरी !

# मालवून टाक दीप

मालवून टाक दीप चेतवून अंगअंग !
राजसा किती दिसांत लाभला निवांत संग !

त्या तिथे फुलाफुलात
पेंगते अजून रात;
हाय तू करू नकोस एवढ्यात स्वप्नभंग !

गारगार या हवेत
घेउनी मला कवेत
मोकळे करून टाक एकवार अंतरंग !

दूरदूर तारकांत
बैसली पहाट न्हात :
सावकाश घे टिपून एकएक रूपरंग !

हे तुला कसे कळेल ?
कोण एकटे जळेल ?
सांग, का कधी खरेच एकटा जळे पतंग ?

काय हा तुझाच श्वास ?
दर्वळे इथे सुवास !
बोलरे हळू उठेल चांदण्यावरी तरंग !

# इंद्रजाल

भोवतालची भयाण रात्र ही सरेना !
अन् शिरावरील तप्त सूर्य मावळेना !

कोठल्या तरी लयीत
बांधतो विरक्त आस !
त्याच त्या खुळ्या भ्रमात
ताणतो अजून श्वास !
ह्यापुढे अजून हाच जन्म ताणवेना !

पाहुनी मला उभाच
थांबला जरा न काळ !
" हे असे कसे ? " म्हणून
फोडितो जरी कपाळ
ही समोरची बनेल भिंत पाझरेना !

माझियाच आसवात
चालल्या दिशा बुडून
अन् कधीतरी इथेच
मी पडेन उन्मळून !
येथल्या हवेस मात्र घामही फुटेना !

माझिया पलीकडेच
चालले कळे न काय ?
कारणाविना फुलात
वाजती हळूच पाय !
नाव घेउनी मलाच हाक मारवेना !

तोडितो तरी तुटे न
हे जिवंत इंद्रजाल !
अन् लकाकतो मनात
एक आरसेमहाल...

चेहरा तुझा अजून हाय सापडेना !

## प्रार्थना

गंजल्या ओठास माझ्या धार वज्राची मिळू दे !
आंधळ्या आत्म्यात माझ्या सूर्य सत्याचा जळू दे !

पांगळा बंदिस्त माझा जन्म आकाशून जावो;
वादळी आवेग माझा चार भिंतींना कळू दे !

सारखे सौंदर्य माझ्या कोरड्या गात्री खळाळो;
सारखे अस्तित्व माझे पेटताना वर्दळू दे !

लाभु दे लाचार छाया मोठमोठ्यांना परंतू
तापल्या मातीत माझा घाम मानाने गळू दे !

आणु दे गा वंचकांना क्रूस छद्माचा दयाळा;
रक्त येशूचे परी डोळ्यांत माझ्या साकळू दे !

# कलंदराचे गीत

फाटक्या पदरात माझ्या का तुझे मावेल अंबर ?
दानही करशील तू, पण मी असा आहे कलंदर !

कुंतलांनी बांधिला तू धावता बेबंद वारा;
पापण्यांनी झाकिला तू एक एकाकी निखारा;
सजविला विजनांत माझ्या तू वसंताचा पसारा;

का अशी केलीस माझी वेदना तू अधिक सुंदर ?

कुठून मज आले अचानक हे प्रकाशाचे निमंत्रण ?
मी कसे सोसू अकल्पित हे सुगंधांचे समर्पण ?
हा कसा माझ्या पथावर रिमझिमे सुकुमार श्रावण ?

आसवांना काय सांगू ? सुख तुझे छळते अनावर !

मी असा दाही दिशांना वारियाने विखुरलेला;
मी असा माझ्या मनांतुन नेहमीचा हरवलेला;
हाय ! हातातून माझ्या मी कधीचा निसटलेला !

अन् तरी गीतात माझ्या उमलतो आहे तुझा स्वर !

## मनातल्या मनात मी

मनातल्या मनात मी तुझ्यासमीप राहतो !
तुला न सांगता तुझा वसंत रोज पाहतो !

असेच रोज नाहुनी
लपेट ऊन्ह कोवळे,
असेच चिंब केस तू
उन्हात सोड मोकळे;
तुझा सुगंध मात्र मी इथे हळूच हुंगतो !

अशीच रोज अंगणी
लवून वेच तू फुले,
असेच सांग लाजुनी
कळ्यांस गूज आपुले;
तुझ्या कळ्या, तुझी फुले इथे टिपून काढतो !

अजून तू अजाण ह्या
कुवार कर्दळीपरी;
गडे विचार जाणत्या
जुईस एकदा तरी :
" दुरून कोण हा तुझा मरंद रोज चाखतो ? "

तसा न राहिला अता
उदास एकटेपणा;
तुझी रूपपल्लवी
जिथे तिथे करी खुणा;
पहा कसा हवेत मी तुझ्यासवे सळाळतो !

# माझा वऱ्हाड

माझ्या वऱ्हाड देशात
सोने पिकते वावरी
त्याची कराया राखण
होई कुबेर सोकारी ॥१॥

माझ्या वऱ्हाड देशात
नांदे अजून गोकुळ;
ठुमकते ठाईठाई
कपाशीची चंद्रावळ ॥२॥

माझ्या वऱ्हाड देशात
गावागावाले संतरा;
राघू नभींचे बोलती
"इथे राजें हो उतरा !" ॥३॥

माझ्या वऱ्हाड देशात
न्यारा मऱ्हाटी शृंगार;
जशी सजुनिया चाले
कोन्या पाटलाची पोर ॥४॥

माझ्या वऱ्हाड देशात
रंगे बंगल्याचं पान :
"चुना लाविते लक्षुमी
काथ लावी नारायन" ॥५॥

माझ्या वऱ्हाडाकडेच
महादेवाचा डोंगर,
तेथे अजून झोपला
भोळा किसान-शंकर ॥६॥

# आज मी जे गीत गातो

आज मी जे गीत गातो ते उद्या गातील सारे !
चालु दे वक्षात माझ्या वादळांचे येरझारे !

उंच आकाशांत माझी गुंजने होतील तेव्हा
साखे होतील माझे पर्वतांमाजी पुकारे !

कोटि कंठांतून माझी वैखरी घेईल ताना,
शब्द हा एकेक माझा वेचून घेतील तारे !

लाघवी काही फुलांची लोचने होतील ओली
दूरच्या येतील हाका...."तू पुन्हा येशील का रे ?"

रंगल्या पूर्वेस माझी वेदना देईल लाली
अन् तुझ्या दारात माझी धूळ हे नेतील वारे !

# जगत मी आलो असा

जगत मी आलो असा की, मी जसा जगलोच नाही !
एकदा तुटलो असा की, मग पुन्हा जुळलोच नाही !

जन्मभर अश्रूंस माझ्या शिकविले नाना बहाणे;
सोंग पण फसव्या जिण्याचे शेवटी शिकलोच नाही !

कैकदा कैफात माझ्या मी विजांचे घोट प्यालो;
पण प्रकाशाला तरीही हाय, मी पटलोच नाही !

सारखे माझ्या स्मितांचे हुंदके सांभाळिले मी;
एकदा हसलो जरासा, मग पुन्हा हसलोच नाही !

स्मरतही नाहीत मजला चेहरे माझ्या व्यथांचे;
एवढे स्मरते मला की, मी मला स्मरलोच नाही !

वाटले मज गुणगुणावे, ओठ पण झाले तिऱ्हाइत;
सुचत गेली रोज गीते; मी मला सुचलोच नाही !

संपल्यावर खेळ माझ्या आंधळ्या कोशिंबिरीचा ...
लोक मज दिसले अचानक; मी कुठे दिसलोच नाही !

# गेलो निघून दूर

गेलो निघून दूर पुन्हा आढळेन का?
माझा कमाल शोध, परी सापडेन का?

झाला किती उशीर....किती लोटली युगे....
आता मला स्मराल परी मी असेन का?

तेव्हा उगीच चार लकेरीत गुंतलो;
माझे उदास गीत अता गुणगुणेन का?

"होता कसा?"–कशास फुलांना विचारता?
होतो जसा तसाच पुन्हा मी घडेन का?

लाभे असून काय? न लाभे नसूनही?
आलो इथे चुकून...पुन्हा मी चुकेन का?

आता व्यथेपल्याड उभा दूर दूर मी...
डोळे तिथे पुसाल–इथे मी ढळेन का?

घाला खुशाल वाद अता लाख मागुनी;
मातीमधून ह्याच कधी मी उठेन का?

# दुभंगून जाता जाता

दुभंगून जाता जाता मी अभंग झालो !
चिराचिरा जुळला माझा; आत दंग झालो !

सल जुनेच सलता सलता
सुखावून गेले !
अन् हळूच गुणगुणती हे
वळ न मोजलेले !
कशी कथा सरता सरता पूर्वरंग झालो !

किरण एक धरुनी हाती
मी पुढे निघालो !
अन् असाच वणवणतांना
मी मला मिळालो !
सर्व संग सुटले, माझा मीच संग झालो !

ज्ञानदेव लिहुनी गेले
ओळओळ भाळी !
निमित्तास माझे गाणे,
निमित्तास टाळी !
तरू काय ? इंद्रायणिचा मी तरंग झालो !

कुठे दिंड गेली त्यांची
कळेना बिचारी !
मी इथेच केली माझी
सोसण्यात वारी !
'पांडुरंग' म्हणता म्हणता पांडुरंग झालो !

## तसा मी राहिलो नाही !

स्मरायासारखा आता तसा मी राहिलो नाही !
कहाणी संपली माझी – जरी मी बोललो नाही !

अता मागून ह्या शंका, अता मागून ही चर्चा :
कसा मी वागलो होतो ? कसा मी वागलो नाही ?

अता मी ऐकतो...तेव्हा जरा झंकारलो होतो;
तसा झंकारतांनाही कधी झंकारलो नाही !

अता खोटे जगायाला निमित्ते शोधतो खोटी;
असा आभास मी माझा...जसा मी जन्मलो नाही !

कशाला आठवू आता अवेळी मागची नाती ?
...कधी ह्या आसवांनाही हवासा वाटलो नाही !

अशी ही शेवटी माझ्या जिवाची संपली यात्रा
जिथे मी भेटलो होतो तिथे मी थांबलो नाही !

## कवाडे

सानथोरांनी दुकाने थाटली;
मीच हा हिंडे भणंगासारखा !
मोठमोठ्यांनी 'कमाई' लाटली;
मीच चतकोरास झालो पारखा !

एक : माझ्या सोबतीला वादळे
लावुनी खांद्यास खांदा चालती;
माझिया मस्तीत मी जाई पुढे
मात्र बाजारू कवाडे लागती !

# पालखी

अजून आसवे किती पुसायचीच राहिली !
अजून अंतरे किती जळायची न थांबली !

उगीच काय काळच्या पिढ्या तशाच संपल्या ?
उगीच काय ही फुले अम्ही जपून ठेवली ?

अरे, कसे अजून हे कुणी न तख्त फोडले ?
लहानशी घरेच ही फुटावयास लागली !

पराभवापलीकडे अजून युद्ध चालले;
अजून माणसेच ही खरीखुरी न पेटली !

कितीक रामकृष्ण ह्या धुळीत शांत जाहले;
सुळावरील भाकिते सुळावरीच राहिली !

अजून विठ्ठलापरी दिसे कुठे न भाकरी;
अजून पालखीपुढे जनावरेच चालली !

# समजावता न आले

समजावुनी व्यथेला समजावता न आले !
मज दोन आसवांना हुलकावता न आले !

सर एक श्रावणाची आली...निघून गेली...
माझ्या मुक्या तृषेला पण बोलता न आले ?

सुटला कधी न जो मी मज घातला उखाणा;
माझ्याच उत्तराला मज शोधता न आले !

चुकवूनही कसा हा चुकला न शब्द माझा
देणे मलाच माझे नाकारता न आले !

लपवीत गीत माझे पळ काढला तरीही
हृदयांतल्या विजांना झिडकारता न आले !

केले जरी खुलासे मीही नकोनकोसे,
जगणे अखेर माझे मज टाळता न आले !

## विसरून जा !

विसरून जा ! विसरून जा ! तुजलाच तू विसरून जा !
तुझियाच आयुष्याचिया हाकांसचे हरवून जा !

आता न ती स्वप्ने तुझी, आता न ती गीते तुझी;
तुटली तुझी लय शेवटी : तूही असाच तुटून जा !

येथे तुझी चाहूलही तुजपासुनी पळ काढते—
दूरस्थ जो आहेस तू त्याच्याकडे परतून जा !

ह्या बंद दारांना कधी येईल का करुणा तुझी ?
ओसाड ह्या गावांतुनी आता निमूट निघून जा !

जे भाग्यवंतांना मिळे ते दुःख तुजला लाभले;
रडणे तुझे सांगू नको; हसणे तुझे उधळून जा !

अद्यापही पदरात का जपशी अशी तारांगणे ?
उल्केपरी जगलास तू उल्केपरी निखळून जा !

वणवा तुझ्या हृदयातला लपवून ठेव असाच तू....
जर पेटलास चुकूनि तू तर आसवात बुडून जा !

आजन्म वैऱ्यासारखे ज्याने तुला वेडावले—
तो चेहरा होता तुझा....त्यालाच वेडावून जा !

# असेच हे

असेच हे कसेबसे
कसेतरी जगायचे,
कुठेतरी कधीतरी
असायचे ...नसायचे.

असेच सोससोसता
हसून हासवायचे;
असेच हासहासता
हळूच विव्हळायचे.

असाच राहणार मी
जिता तुरुंग आपुला,
असाच वाळगीन मी
सुटावयास शृंखला.

असाच हा गिळायचा
गळ्यामधील हुंदका;
कसेबसे जगायचे
धरून धीर पोरका.

अशीच येथली दया
हवेत चाचपायची;
अशीच जीवनास ह्या
पुन्हा क्षमा करायची.

असाच श्वास तोकडा
पुन्हा पुन्हा धरायचा
असाच जन्म फाटका
पुन्हा पुन्हा शिवायचा.

असेच पेटपेटुनी
पुन्हापुन्हा विझायचे;
हव्याहव्या क्षणासही
नको नको म्हणायचे.

असेच निर्मनुष्य मी
जिथेतिथे असायचे;
मनात सूर्य वेचुनी
जनात मावळायचे.

## गाण्याची कहाणी

साऱ्याच डोळ्यांची उभी डोळ्यात माझ्या आसवे !
जे सोशिले, जे सोसतो—तेही न आता जाणवे !

बेवारशी मी सोडिला माझा करंटा हुंदका;
—त्यांच्या दयेला मी रडू नाही दिले माझ्यासवे !

आयुष्य गेले शेवटी आरोप खोटे लादुनी;
माझ्या खुलाशांचे परी थोतांडही नाही नवे !

होता कुणाचा क्रूस जो मी वाहिला खांद्यावरी ?
—जे ठोकले गेले खिळे त्यांनीच केली आर्जवे !

## ऋण

सभोवार हा किर्र अंधार आहे,
मशालीपरी एकटा मी जळे;
प्रकाशातले तोतये सूर्य होती
मला पाहता पाहता आंधळे.

दुभंगून आयुष्य गेले तरीही
मला आतल्याआत मी सांधतो;
पराभूत मागील माझ्या पिढ्यांची
ऋणे साहता साहता फेडतो !

# रंग माझा वेगळा

रंगुनी रंगात साऱ्या रंग माझा वेगळा !
गुंतुनी गुंत्यात साऱ्या पाय माझा मोकळा !

कोण जाणे कोठुनी ह्या सावल्या आल्या पुढे;
मी असा की लागती ह्या सावल्यांच्याही झळा !

राहती माझ्यासवे ही आसवे गीतांपरी;
हे कशाचे दुःख ज्याला लागला माझा लळा !

कोणत्या काळी कळेना मी जगाया लागलो
अन् कुठे आयुष्य गेले कापुनी माझा गळा ?

सांगती ' तात्पर्य ' माझे सारख्या खोट्या दिशा :
" चालणारा पांगळा अन् पाहणारा आंधळा ! "

माणसांच्या मध्यरात्री हिंडणारा सूर्य मी :
माझियासाठी न माझा पेटण्याचा सोहळा !

## अनोळखी

डोळे मिटून रूप तुझे मी निहाळले;
माझे शिवून ओठ कितीदा पुकारले !

आली जशी तशीच निघाली मनोगते...
आयुष्य हे उभेच प्रतीक्षेत राहिले !

केली तशी हजार जगाया समर्थने;
(आले चुकून भान—मला मी अव्हेरले !)

खोळंबली जरा न कुणाचीच सांत्वने,
माझे रडे मलाच हसायास लागले !

आला तुझा सुगंध व्यथेला कधीकधी;
माझ्या न ओंजळीस तुझी लाभली फुले !

होती जरी समीप तुझी आर्त चिंतने;
आकाश दूरदूर...तुझे दूर वर्षले !

जेव्हा अखेर मीच निघालो अनोळखी,
माझे हळूच नाव तुला मी विचारले !

ग्रंथालय
२५८२
२५८०३
काव्य
११।३।८२

# उपदेश

साऱ्याच शंकांची अशी मागू नको तू उत्तरे !
असतात शंकेखोर जे त्यांचे कधी झाले बरे ?

वेड्या, शहाण्यासारखा तू खा शिळी ही भाकरी,
घाणेरड्या खोलीत ह्या शोधू नको आता घरे !

बोंबा अशा मारू नको ! त्यांना तुझी चिंता किती !
मागेच दुःखाची तुझ्या भरली तयांनी टेंडरे !

तू मान वेदांत्यापरी सारीच खोटी इंद्रिये,
पण जाण अपुले पोट तू ह्या इंद्रियांमाजी खरे !

जमणारही नाही तुला त्यांची तिकोनी संस्कृती :
रे, बायकोमागे तुझ्या लेंढार पोरांचे फिरे !

संभावितांना तू कधी सांगू नको स्वप्ने तुझी :
चोरोनिया नेतील ते बाबा तुझी ही लक्तरे !

येतात जे ओठावरी ते शब्द तू बोलू नको
असती तुझ्या गरजेहुनी गरजू तयांची लेक्चरे !

प्रस्थापितांचे बंड हे त्यांची प्रतिष्ठा वाढवी,
त्यांच्या तुताऱ्या वेगळ्या—हाती तुझ्या पोंगा उरे !

# सूर

तसे किती काटे रुतले आमुच्या गतीला;
तुझा सूर केवळ होता एक सोबतीला !

अनोळखी बनले अवघे
सोबती यशाचे,
दूरदूर झाले सारे
सोयरे सुखाचे;
कुणीही न पुसले डोळे हाय त्या घडीला !

कसा हा घरट्याचाही
उडाला निवारा;
तुझ्या चार चिमण्यांसाठी
राहिला न चारा
दारदार परके झाले मायबापडीला !

मग हळूच आम्हालाही
तुझे पंख आले,
मग हळूच अमुचे डोळे
सूर्यचंद्र झाले;
दिशादिशा तेवत उठल्या तुझ्या आरतीला !

## गे मायभू

गे मायभू तुझे मी
फेडीन पांग सारे;
आणीन आरतीला
हे सूर्य, चंद्र, तारे.

आई, तुझ्यापुढे मी
आहे अजून तान्हा;
शब्दात सोड माझ्या
आता हळूच पान्हा.

आई, तुझ्यापुढे ही
माझी व्यथा कशाला ?
जेव्हा तुझ्यामुळे ह्या
जन्मास अर्थ आला !

मी पायधूळ घेतो
जेव्हा तुझी जराशी,
माझी ललाटरेषा
बनते प्रयाग...काशी !

आई, तुझी अशी मी
गाईन रोज गाणी;
माझी तुझ्या दुधाने
गेली भिजून वाणी !

# आता मजेने बोलतो

आता मजेने बोलतो भेटेल त्या दुःखासवे !
सांभाळुनी घेती मला माझी इमानी आसवे !

प्रत्येक वेळी मी मला माझी खुशाली सांगतो,
प्रत्येक वेळी आणतो ओठांवरी हासू नवे !

सैराट तेव्हा हिंडला माझाच टाहो पोरका,
आता इथे जे सोसतो ते आसऱ्यासाठी हवे !

माझा जगायाचा गुन्हा माझ्याच संगे संपला :
जो संपलो मी एकदा त्याला न आता शोधवे !

माझ्या चितेला चूड मी लावून झालो मोकळा;
आता कशाला मी करू ज्या त्या बध्यांची आर्जवे ?

आता अनुज्ञेवाचुनी गातात ही गीते मला;
माझा स्वतःचा सूरही आता न ओठी पालवे !

केव्हातरी दात्यापरी आयुष्य हाका मारिते;
मीही असा भिक्षेकरी ज्याला न काही मागवे !

## सवय मला झाली

प्रकाशात माझे डोळे
मला भूल देती :
चेहरे खरे वा खोटे
ओळखू न येती.

कसे लोक मजला माझी
सांगती खुशाली;
एक मोहरे मी...त्यांच्या
लाख लाख चाली.

जरी शब्द उरला माझा
एकटा इमानी,
पुन्हा तीच भाकर उष्टी
खेचते दुकानी.

कधी मुके रडणे माझे
बुडवितात टाळ्या,
कधी हाय स्वप्ने करिती
मागुनी कुचाळ्या.

आसपास मुर्दाडांची
नांदती घराणी;
तोंडपाठ त्यांना माझ्या
घराची कहाणी.

कितीवार आयुष्याची
उमगते लबाडी,
तरी मी न केली माझी
चुकुनही चहाडी.

— सवय मला झाली आता
रडत हसायाची,
सवय मला झाली येथे
नसुन असायाची.

## विजय

हे असे आहे तरी पण हे असे असणार नाही !
दिवस अमुचा येत आहे : तो घरी बसणार नाही !

हे खरे की, आज त्यांनी घेतले सारेच ठेके;
पण उद्या त्यांच्या चितेवर एकही रडणार नाही !

छान झाले दांभिकांची पंढरी उद्ध्वस्त झाली;
ह्यापुढे वाचाळ दिंडी एकही निघणार नाही !

बांधती ते रोज भिंती, सांगती ते धर्मजाती;
पण उद्याचा सूर्य काही त्यामुळे फसणार नाही !

आजचे अमुचे पराभव पचवतो आम्ही उद्यास्तव;
विजय तो कसला उरावर जखम जो करणार नाही !

## व्यवहार

सारेच हे उमाळे आधीच योजलेले
सारेच हे जिव्हाळे आधीच वेतलेले !

सांभाळतात सारे आपापली दुकाने;
माझेच हे दिवाळे काढून लोक गेले !

मी हा भिकारडा अन् माझी भिकार दुःखे;
त्यांचे हुशार अश्रू आधीच गाजलेले !

माझी जगावयाची आहे कुठे तयारी ?
त्यांच्या नकोत युक्त्या जे जन्मताच मेले !

माझ्या शिळ्या भुकेची उष्टी कशास चर्चा ?
जे घालतात भिक्षा तेही उभे भुकेले !

आता कुणाकुणाचे मी घाव आठवावे ?
येतात जे दिलासे तेही उगारलेले !

## तरुण आहे रात्र अजुनी

तरुण आहे रात्र अजुनी राजसा निजलास का रे ?
एवढ्यातच त्या कुशीवर तू असा वळलास का रे ?

सांग, ह्या कोजागिरीच्या चांदण्याला काय सांगू ?
उमलते अंगांग माझे....आणि तू मिटलास का रे ?

अजुनही विझल्या न गगनी तारकांच्या दीपमाला;
अजुन मी विझले कुठे रे ? हाय ! तू विझलास का रे ?

ओठ अजुनी बंद का रे ? श्वासही मधुमंद का रे ?
बोल, शेजेच्या फुलांवर तू असा रुसलास का रे ?

उसळती हृदयांत माझ्या अमृताच्या धुंद लाटा ...
तू किनाऱ्यासारखा पण कोरडा उरलास का रे ?

## विपरीता

डोळे शिवून माझे
तू सांगशी पहाया;
कापून कंठ माझा
आवर्जतेस गाया !

## पहाटे पहाटे

पहाटे पहाटे मला जाग आली
तुझी रेशमाची मिठी सैल झाली !

मला आठवेना...तुला आठवेना...
कशी रात्र गेली कुणाला कळेना.

—तरीही नभाला पुरेशी न लाली !

गडे हे बहाणे, निमित्ते कशाला ?
असा राहू दे हात माझा उशाला.

मऊमोकळे केस हे सोड गाली !

कसा रामपारी सुटे गार वारा
मला दे उशाशी पुन्हा तू उबारा

अता राहू दे बोलणे, हालचाली !

तुला आण त्या वेचल्या तारकांची,
तुला आण त्या जागणाऱ्या फुलांची;

लपेटून घे तू मला भोवताली !

# कॉकटेल

: १ :

श्रीमंतांच्या व्यथा,
श्रीमंतांची खंत;
श्रीमंतांसाठी हे
श्रीमंतांचे संत.

: २ :

माझे खरेखोटेपण मलाच ठाऊक;
व्यर्थ निघतात माझे निष्कर्ष घाऊक;
परी माझे हिजड्यांशी येथल्या जमेना :
त्यांचे सुखवस्तु बंड, माझी जागी भूक.

: ३ :

कसे सज्जन सोयरे,
कसे मायाळू सोबती
माझ्या पगाराआधीच
माझा आकडा लावती.

: ४ :

करिती ते उपदेश ज्यांचे बरे चाले,
ठरती ते चोर ज्यांचे काही न राहिले;
बरे झाले, मी न केला कुणा उपदेश
—असे काय पांडुरंगा, माझे बरे झाले !

: ५ :

आपुलेच यश जे जे गाती
सदैव द्यावी त्यांना सूट;
कुणी विचारू नये तयांना
किती चाटले त्यांनी बूट ?

# स्वगत

काळ गेला पुढे, बघत मी राहिलो !
" दिवस हा कोणता ?" पुसत मी राहिलो !

ऋतु जरी संपला,
भर जरी उतरला,
उगीच सुकली फुले टिपत मी राहिलो !

गाव नव्हते खरे,
पुसट होती घरे...
तुटक पण चेहरे स्मरत मी राहिलो !

अलिकडे गुंतलो,
पलिकडे थांबलो,
आणि मधल्यामधे अडत मी राहिलो

कितिकदा वाटले,
कुणितरी भेटले...
दूर अंधुक मला दिसत मी राहिलो !

अधून मी हुरळलो
मधून मी उसळलो,
सतत माझ्यावरी फुटत मी राहिलो !

उगीच काहीतरी
वदत गेलो जरी
जन्मभर एकटा स्वगत मी राहिलो !

करूनही बेरजा
मीच झालो वजा;
गणित कुठले तरी चुकत मी राहिलो !

लोक उठले असे
जवळ नव्हते जसे;
भोवतीची हवा धरत मी राहिलो !

## ने मला

सांडलो मागेच मी कोठेतरी
माझिया अंधारल्या वाटेवरी.

फक्त छद्मी भास माझे राहिले
जे मला, माझ्या दिशेला बाधले.

मी न माझा चेहराही पाहिला;
शब्दही माझा न येथे ऐकिला.

ही न पायांखालची माझी भुई;
हा न मी; ही एक माझी आवई.

तूच आता ने मला माझ्याकडे
त्या तिथे...जेथे मला मी सापडे.

## प्राणाच्या बासरीत

प्राणाच्या बासरीत सूर तुझा घुमतो ग
अन् असाच जन्म तुला ऐकण्यात सरतो ग.

मधुर तुझ्या तंद्रीतच
विरतो मी सावकाश
अन् माझ्या आसपास
झरतो कोमल प्रकाश.
मिटलेल्या लोचनात चंद्र तुझा ढळतो ग.

उसळे तुझिया लयीत
रक्ताची लाटलाट;
भिजतो हा गलबलून
देहाचा सुन्न घाट.
मागे मी फिरतो पण खोलखोल बुडतो ग.

मी इथल्या मयसभेत
आलो कुठूनी चुकून;
तूच एक लाभतेस
अंतरात भरभरून.
दान तुझे घेताना मीच दान बनतो ग.

सोडुन मज वाटेवर
आलो मी दूरदूर :
तुटले जन, सुटले जग...
पण हा सोडी न सूर.
मी उगीच हुकलेली सम शोधत असतो ग.

# वचन

भोगले जे दुःख त्याला सुख म्हणावे लागले !
एवढे मी भोगिले की मज हसावे लागले !

ठेविले आजन्म डोळे आपुले मी कोरडे
पण दुज्यांच्या आसवांनी मज भिजावे लागले !

लोक भेटायास आले काढत्या पायांसवे
अन् अखेरी कुशल माझे मज पुसावे लागले !

गवसला नाहीच मजला चेहरा माझा कधी
मी कसा होतो मलाही आठवावे लागले !

पांगळे आयुष्य थकुनी बैसले वाटेवरी
जागच्या जागीच मजला परत यावे लागले !

एकदा केव्हातरी मी वचन कवितेला दिले;
— राखरांगोळीस माझ्या गुणगुणावे लागले !

## सांजवेळ

सुखाच्या सावल्या साऱ्या कशा वेडावुनी जाती;
जसा मी फोडितो टाहो तशा त्या तोडिती नाती.

कधी वाटे पुढे जावे, सुखाला दु:ख सांगावे;
सुखाची पाहुनी दु:खे इथे माझी फुटे छाती.

कशी साऱ्या जिव्हाळ्यांची जिव्हारी लागते माया;
कशी साऱ्याच शब्दांची उरे माझ्या मुखी माती !

जराशा ओळखीचाही कुणीही राहिला नाही;
रिकामे दान मी माझे पुन्हा घेतो रित्या हाती.

कसा कापूर जन्माचा उडाला आरतीआधी,
कसा ह्या सांजवेळेला दिव्यांच्या कोरड्या वाती !

## भ्रम

इथे मंद छायातुनी स्पंदनांच्या
तुझ्याशी लपंडाव मी खेळतो;
जिवाच्या अशा सांजवेळी कळेना
तुला शोधतो की मला शोधतो.

# मी निघालो

खाजगी दु:खास दैवी मानणारा वेगळा !
राहुनी माणूस अश्रू वाटणारा वेगळा !

पेटल्या वस्तीत चर्चा ही अशी नाही बरी;
—तो निखारा वेगळा अन् हा निखारा वेगळा !

ते भिकारी थोर, त्यांच्या धर्मशाळा वेगळ्या,
चालतो कंगाल सत्याचा गुजारा वेगळा !

सोसण्या आयुष्य थोडे, सोसुनी घ्यावे हसू ;
त्या विषासाठी विषाचा हा उतारा वेगळा !

नेहमीच्या यातनांची कैद ही नाही खरी,
मात्र मेलेल्या मनाचा कोंडमारा वेगळा !

हा न टाहो दु:खितांचा, हा सुखाचा ओरडा;
—होत आहे दूर बंडाचा पुकारा वेगळा !

जागलो तेव्हा न होता माझियापाशी दिवा;
मी निघालो अन् उदेला एक तारा वेगळा !

# आम्ही जिवंत राहू !

आम्ही जिवंत राहू ! आम्ही जिवंत राहू !
आम्हीच ते उद्याचे आकाशरंग पाहू !

त्यांची परस्परांची
पूजा सुरूच राहो;
आम्ही कधी न फोडू
त्यांच्या पुढ्यात टाहो;
येताच वेळ त्यांचा लाचार दंभ दाहू !

आम्ही नसू यशस्वी,
आम्ही नसू विकाऊ,
आम्ही नसू सुखाचा
सारांश भाडखाऊ;
आम्ही परी ' उद्या 'चे दुर्दम्य वज्रबाहू !

आम्ही असू अडाणी,
आम्हा न रीतिभाती;
आम्ही असेच राहू
मातीमधील माती;
हे सोसणे युगांचे थोडे अजून साहू !

आम्ही असू दरिद्री
सर्वस्व हारलेले,
आम्ही असू अभागी
आजन्म अर्धमेले;
जिंकू अखेर आम्ही जे जे अलभ्य चाहू !

जेव्हा अम्ही भडाग्नी
त्यांच्या जगास देऊ,
एकेक आसवाचा
तेव्हा हिशेब घेऊ;
खांद्यावरून तेव्हा हे सूर्यचंद्र वाहू !

## आसवांनो !

आसवांनो, माझिया डोळ्यांतुनी वाहू नका !
अंतरीच्या वेदना साऱ्या जगा दावू नका !

घाव हे माझे गुलाबी मोहराया लागले;
कोण मी आहे मला आतातरी सांगू नका !

हासते आयुष्य माझे पाहुनी माझी दशा;
का तुम्हीही हासता ? हासू नका ! हासू नका !

स्वप्न माझे भंगले अन् गीत माझे संपले;
हाय बाजारात माझा हुंदका आणू नका !

# बोल माझ्या फुला !

रंग माझा तुला ! गंध माझा तुला !
बोल काहीतरी ! बोल माझ्या फुला !

सांग लाजूनही
नाव आतातरी;
एक खोळंबले
गीत माझ्या उरी;
अन् वसंतास मी शब्द माझा दिला !

वेळ जादूभरी...
ही गुलाबी हवा !
ही न मेंदी तुझी,
रंग माझा नवा !
भास झाला खरा ! श्वास झाला खुला !

हाय, माझी तुझी
भेट झाली अशी :
शीळ यावी पुढे
चांदण्याची जशी.
सांग, सोडू कसा हात हातातला !

## कौल मागत राहिलो

उगिच मी इथल्या जगाला आजमावत राहिलो !
ह्या प्रतिष्ठित उकिरड्यांवर जीव टाकत राहिलो !

मी तसा नव्हतोच इथला, पण जगावे लागले...
उगिच ह्या उपऱ्यांत नाती रोज शोधत राहिलो !

चोरबाजारात इथल्या जपुन मी फिरलो जरी
ते हिरावत राहिले अन् मी गमावत राहिलो !

उमलली नव्हती फुले, ही बहरली नव्हती धरा;
शेष माझे दिवस मी श्वासात ओवत राहिलो !

बोलले नाही कुणी अन् हासले नाही कुणी;
एकटा ओशाळवाणे मीच हासत राहिलो !

मी तशा केल्या खुणा पण तुडवुनी गेली सुखे;
राहिलेल्या आसवांना मग खुणावत राहिलो !

त्या सुसंस्कृत श्वापदांनी बांधिली अपुली घरे...
मोडक्या दारापरी मी खिन्न वाजत राहिलो !

फक्त होते भोवताली मुखवट्यांचे मुखवटे
हाय, मी त्या मुखवट्यांचे मन तपासत राहिलो !

उचलुनी हत्यार जेव्हा लोक सारे धावले
मी दुतोंडी दैवतांना कौल मागत राहिलो !

# मजेत मी !

आयुष्य बेचिराख तरीही मजेत मी !
आली व्यथा कवेत, व्यथेच्या कवेत मी !

आताच तो उदास लपंडाव संपला;
थोडे उजडताच...मिळालो सचेत मी !

झाला जमा अखेर निराधार हुंदका;
आता नसो खुशाल कुणाच्या जमेत मी !

आता कसा निवांत सुखेनैव सोसतो,
घेतो भरून श्वास फुलांच्या हवेत मी !

येती तशी अजून घराची निमंत्रणे;
रस्त्यावरी उभाच मनाच्या सभेत मी !

माझा न मी उगीच पणा प्राण लावला;
गेला चुकून ताल तरीही समेत मी !

# आजकाल

आजकाल नसती माझ्या ओंजळीत तारे !
मी उगीच शोधत असतो नभाचे किनारे !

जवळ ही उगीच असाया;
शिळी चांदण्याची छाया;
रणरणून मजवर उठती उन्हाचे शहारे !

दिवसही फुलांचे नुरले
जे मलाच टिपुनी विरले;
कुठेतरी निघुनी गेले मनसुगंध सारे !

मला ही न पटली वस्ती :
किती धूर्त इथली मस्ती;
इथे घोट घेण्याआधी मागती उतारे !

कवीतरी तेव्हा चुकलो :
एकदाच दिसुनी लुकलो;
हळुच श्वास पुसतो माझा, "तू जिवंत का रे ?"

जरी कधी पाउल वाजे
(जसे कुणी थबकुन लाजे)
फक्त सुने अंगण माझे करी येरझारे !

करुनिया जिवाची होळी
दोनचार लिहिल्या ओळी
आता मला लिहिण्यासाठी गिरविती निखारे !

# गोळाबेरीज

विटले जगाचे रंग अन् प्राणासही गेले तडे !
जेव्हा अचानक भेटतो...परकाच मी मज सापडे !

न कळे कशासाठी पुन्हा संदर्भ माझे थांबले
माझ्यातल्या गर्दीतुनी येऊ कसा माझ्याकडे ?

पुसुनी मला जाती ऋतु : "असतोस वा नसतोस तू ?"
—उसळे फुलांची लाट अन् माझ्या गळ्यामाजी अडे !

मधुनीच कोलाहल कुण्या गंधोत्सवाचा ऐकतो;
मधुनीच चाचपुनी मला भेसूर मी येथे रडे !

मागेच सारा डाव मी उधळून माझा टाकला...
प्रत्येक दानाच्या क्षणी मी नेमका उलटा पडे !

आता त्रयस्थासारखा आयुष्य विझले पाहतो...
( चुकुनी बसे चटका जशी माझ्यातुनी ठिणगी झडे ! )

आजन्म मी मजला जरी सव्याज फेडत राहिलो
आले तगाद्याला पुन्हा इथले जिव्हाळे कोरडे !

# चकवा

झाले ते विषयांतर,
होई तो बकवा;
गेला तो वाटविक्या,
आला हा चकवा.

सरले ते रामायण,
उरली ती लंका;
फिटले ते अग्निदिव्य,
न फिटे ती शंका.

जमला तो शुकशुकाट
न जमे ती गर्दी;
निजला तो जाणकार,
पेंगे तो दर्दी.

न फिरे ती पत्रावळ,
फिरते ती झोळी;
न मिळे ती भाकरीच
मिळते ती गोळी.

रडलो ती लूटमार,
कण्हतो तो दंगा;
हुंदका हरामखोर,
अश्रूही लफंगा.

मेला तो मुडदा पण
जगतो तो मुडदा;
पडद्याच्या नाटकात
पडद्यावर पडदा !

# चांदण्यात फिरताना

चांदण्यात फिरताना माझा धरलास हात !
सखया रे, आवर ही सावर ही चांदरात !

निजलेल्या गावातुन
आले मी एकटीच;
दूर दिवे कळलावे
पडले मागे कधीच;
ह्या इथल्या तरुछाया पण सारे जाणतात !

सांग कशी तुजविनाच
पार करू पुनवपूर ?
तुज वारा छळवादी
अन् हे तारे फितूर !
श्वास तुझा मालकंस ! स्पर्श तुझा पारिजात !

जाऊ चल परत गडे
जागले न घर अजून,
पण माझी तुळस तिथे
गेली रे हिरमुसून
तुझिया नयनात चंद्र ! माझ्या हृदयी प्रभात !

# कळते रे !

कळते मज सारे कळते रे !
मन माझे तरीही चळते रे !

राखत आले सखया अजवर,
विचारले नसण्याचे अंतर,
शब्द तुला भेटतील नंतर

आयुष्य न मागे वळते रे !

कळते मज तू अवखळ वारा,
कळते मज तू रिमझिम धारा,
...कधी दूरचा पहाटतारा;

तव रूप कसेही छळते रे !

कळते रे हे तुझेच अंगण
जिथे फुलांची नाजुक पखरण,
थकले रे, आले तरिही पण;

का दार तुझे अडखळते रे ?

# सजण दारी उभा !

सजण दारी उभा, काय आता करू ?
घर कधी आवरू ? मज कधी सावरू ?

मी न केली सखे, अजुन वेणीफणी,
मी न पुरते मला निरखिले दर्पणी
अन् सडाही न मी टाकिला अंगणी;

राहिले नाहणे ! कुठुन काजळ भरू ?

मी न दुबळी कुडी अजुन शृंगारिली
मी न सगळीच ही आसवे माळिली,
प्राणपूजा न मी अजुनही बांधिली;

काय दारातुनी परत मागे फिरू ?

बघ पुन्हा वाजली थाप दारावरी :
हीच मी ऐकिली जन्मजन्मांतरी;
तीच मी राधिका ! तोच हा श्रीहरी !

हृदय माझे कसे मीच हृदयी धरू ?

# गझलेची बाराखडी

आता महाराष्ट्रात गझल हा काव्यप्रकार आपल्या अंगभूत शक्तीमुळे दिवसें-दिवस अधिकाधिक लोकप्रिय होऊ लागलेला आहे. आता नव्या दमाची तरुण मराठी पिढी गझलेकडे वळू लागलेली आहे. परंतु दुर्दैवाने गझलेची पुरेशी किंवा मुळीच माहिती नसल्यामुळे कोणतीही रचना अनेकदा 'गझल' म्हणून सादर केली जाते.

गझल हा एक प्रभावी काव्यप्रकार असल्यामुळे **गझल लिहिणारा आधी उत्तम कवी असला पाहिजे, ही गझलेची पूर्वअट आहे.** आणि त्याबरोबर गझल लिहिणाऱ्याला आधी वृत्तात कोणतीही चूक न करता लिहिता आले पाहिजे. गझलेमध्ये शेवटपर्यंत एकच वृत्त वापरले पाहिजे, हे गझल लिहू इच्छिणाऱ्या कवीने लक्षात ठेवले पाहिजे.

'गझल' हा शब्द स्त्रीलिंगी आहे. मूळ अरबी शब्द 'ग़जल' आहे. तोही स्त्रीलिंगी शब्द आहे. हा शब्द जसाच्या तसा फारसीत आला तोही स्त्रीलिंगी म्हणूनच. आणि मराठीत 'ग़जल' ह्या शब्दाला 'गझल' हे रूप मिळाले. गझलेचा एकूण पिंड, तिचा नखरा व नजाकत पाहता तिचे लिंगपरिवर्तन करणे योग्य नव्हे.

**एकाच वृत्तातील, एकच यमक (काफिया) व अन्त्ययमक (रदीफ) असलेल्या प्रत्येकी २-२ ओळींच्या किमान पाच किंवा त्याहून अधिक कवितांची बांधणी म्हणजे गझल.**

गझलेमधील ह्या प्रत्येक दोन ओळींच्या कवितेला आपण 'शेर' म्हणतो. गझलेमधील प्रत्येक शेर हा आपल्या जागी एक संपूर्ण अभिव्यक्ती असलेली स्वतंत्र व सार्वभौम कविताच असते.

नेहमीची कविता सलग असते, तिची एक 'थीम' असते आणि म्हणूनच ती उलगडत जाते. पण **गझल उलगडत नसते.** एकाच गझलेत विविध विषय हाताळले जाऊ शकतात. प्रत्येक शेराचा आशय स्वतंत्र असू शकतो किंवा एकच संवेदना, एकच भाव किंवा एकच मूड असलेले सर्व शेर असू शकतात.

जर आपण गझलेमधून कोणताही शेर बाहेर वेगळा काढून त्याचे चिंतन केले, तर मागचा पुढचा कोणताही संदर्भ किंवा संबंध नसूनही तो शेर म्हणजे एक संपूर्ण अभिव्यक्ती असलेली वेगळी कविताच असल्याचे आढळून येते.

गझलेच्या फॉर्ममध्ये उलगडत जाणारी सलग कविता लिहिली जाऊ शकते. पण ती कविताच; गझल नव्हे! **म्हणून गझलचे खरे गमक हेच की, प्रत्येक सुटा शेरसुद्धा स्वतंत्र कविताच असतो.**

नेहमीची कविता आणि गझल ह्यात—(१) अनेक कवितांची एकाच फॉर्म-मध्ये बांधणी व मांडणी आणि (२) प्रत्येक शेराचे स्वतःचे कविता म्हणून स्वतंत्र अस्तित्व, हे दोन महत्त्वाचे व मूलभूत फरक असतात.

आता आपण गझलेचा आकृतिबंध म्हणजे काय हे समजून घेऊ या. कारण हा आकृतिबंध समजल्याशिवाय गझल लिहिता येत नाही.

## गझलेचा आकृतिबंध

संबंधित गझलेचे वृत्त (बहर), यमक (काफिया) आणि अन्त्ययमक (रदीफ) असल्यास अन्त्ययमक; या घटकांमुळे गझलेचा आकृतिबंध निश्चित होतो. ह्या आकृतिबंधालाच 'जमीन' असे म्हणतात.

**ही न मंजूर वाटचाल मला**
**दे भविष्या तुझी मशाल मला**
**संत समजून काल मी गेलो**
**भेटला शेवटी दलाल मला**
**मी कधीचा उभाच फिर्यादी**
**वाकुल्या दाखवी निकाल मला**

माझ्या एका गझलेतील हे तीन शेर आपण वाचले. या तिन्ही शेरात (जातीच्या अंगाने आलेले) एकच वृत्त आहे,

**राधिका, राधिका, यमाचा, गा**

हेच वृत्त या गझलेत शेवटपर्यंत कायम राहते. या गझलेचा शेवटचा शेर असा आहे—

**ये, लपेटून चांदणे घेऊ..**
**तू कशाला दिलीस शाल मला ?**

वर निर्देशिलेले वृत्त 'राधिका, राधिका, यमाचा, गा' या शेवटच्या शेरातही कायम आहे.

गझलेच्या पहिल्याच शेरात तिचा आकृतिबंध–तिची 'जमीन' स्पष्ट होते. कारण पहिल्या शेरात गझलेचे वृत्त, यमक आणि अन्त्ययमक स्पष्ट होते.

वर दिलेल्या उदाहरणात वृत्त (राधिका, राधिका, यमाचा, गा) स्पष्ट झाले आहे. आणि पहिल्या दोन ओळीत 'वाटचाल' व 'मशाल' ही दोन यमके आली आहेत. त्याचप्रमाणे दोन्ही ओळीत 'वाटचाल' आणि 'मशाल' या यमकानंतर 'मला' हे अन्त्ययमक आले आहे.

गझल शेवटपर्यंत एकाच वृत्तात चालत असली तरी तिच्या फक्त पहिल्या शेराच्या दोन्ही ओळीत यमक आणि अन्त्ययमक येते. नंतर येणाऱ्या प्रत्येक शेराच्या दुसऱ्या ओळीतच यमक व त्यानंतर अन्त्ययमक येते.

गझलेतील अन्त्ययमक (रदीफ) गझल संपेपर्यंत बदलत नाही. काही गझलात अन्त्ययमक नसते. पण ज्या गझलेत अन्त्ययमक असते, त्या गझलेत ते अन्त्ययमक शेवटपर्यंत कायम राहते, एका शेरात एक अन्त्ययमक तर दुसऱ्या शेरात दुसरे अन्त्ययमक, असा हास्यास्पद प्रकार गझल खपवून घेत नाही.

त्याचप्रमाणे आपण हेही लक्षात घेतले पाहिजे की, गझलेत यमक ऊर्फ काफिया बदलत नाही, तर त्याचे शब्द बदलतात. यमकाच्या शब्दात असलेली 'अलामत' ऊर्फ 'स्वरचिन्ह' हेच त्या यमकाचे स्थायी गमक असते. या अलामतीवरच त्या यमकाचे जीवन अवलंबून असते, हे स्वरचिन्ह (अलामत) सांभाळून यमक कसे साधावयाचे, हे मी येथे नंतर यथास्थल स्पष्ट करीन. त्यापूर्वी 'काफिया' आणि 'रदीफ' या शब्दांचे अधिक स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे.

'काफिया' या अरबी शब्दाचा अर्थ आहे–मागेमागे चालणारा, पुन्हापुन्हा येणारा, पायाला पाय लावून चालणारा.

मी वरील व्याख्येनुसार 'काफिया' अधिक स्पष्ट दाखविण्याचा प्रयत्न करतो.

**चंद्र आता मावळाया लागला**
**प्राण माझाही ढळाया लागला**

**काय तो वेडा इथेही बोलला ?**
**हा शहाणाही चळाया लागला !**

**हाक दाराने मला जेव्हा दिली**
**उंबरा मागे वळाया लागला !**

नमुन्यादाखल दिलेल्या माझ्या एका गझलेतील ह्या तीन शेरात 'मावळाया, ढळाया, चळाया, वळाया' हे चार शब्द काफिया म्हणून आलेले आहेत. 'मावळाया' ह्या शब्दामागून 'ढळाया' हा शब्द येतो. 'ढळाया'ची पाठ

धरून 'चळाया' यतो आणि 'चळाया'नंतर लगेच 'वळाया' हा शब्द त्याच्यामागे येतो. 'ढळाया' ह्या काफिया म्हणून येणाऱ्या शब्दाने 'मावळाया' ह्या काफ़िया म्हणून येणाऱ्या आधीच्या शब्दाचे अनुसरण केलेले आहे, तर नंतरच्या शेरात 'चळाया' ह्या काफिया म्हणून येणाऱ्या शब्दाने 'मावळाया' व 'ढळाया' ह्या शब्दांची पाठ सोडलेली नाही. आणि 'वळाया' हा काफियाचा शब्द 'मावळाया, ढळाया, चळाया' ह्या आधीच्या (काफिया म्हणून आलेल्या) शब्दांशी नाते राखत आहे. 'मावळाया' ह्या काफियाच्या शब्दाच्या मागेमागे एकामागे एक, अशी एकमेकांचा पदर धरून ही इतर (काफियाच्या) शब्दांची माळ चालत आहे. काफिया हा शब्द पुल्लिंगी आहे. काफियाचे बहुवचन 'कवाफी' असे होते.

आता आपण रदीफ म्हणजे काय हे पाहू या—'रदीफ' ह्या अरबी भाषेतील स्त्रीलिंगी शब्दाचे दोन अर्थ आहेत ते असे—

(१) घोडा किंवा उंटावर बसलेल्या स्वारामागे बसलेली व्यक्ती किंवा (२) गझलेतील शेरात काफियाच्या (यमक) नंतर पुन्हापुन्हा येणारा शब्द किंवा शब्दगट.

गझलेच्या संदर्भात सांगावयाचे झाले, तर तिच्या प्रत्येक शेराच्या बाबतीत हे दोन्ही अर्थ अगदी चपखलपणे लागू होतात. कारण आपण जर काफिया (यमक) म्हणून येणाऱ्या कोणत्याही शब्दाला वृत्ताच्या घोड्यावर किंवा उंटावर बसलेला स्वार मानले, तर रदीफ (अन्त्ययमक) म्हणून येणारा शब्द किंवा शब्दगट त्या स्वाराच्या मागे हटकून स्वार होतो, उदाहरणार्थ—

कालची बातमी खरी नाही
हाय, स्वर्गात भाकरी नाही !
मागता काय लेखणी माझी
ही कुणाचीच बासरी नाही !
राहिले काय पूर्णिमेत आता ?
चंद्र माझ्या उशीवरी नाही !

वरील तीन शेरात काफिया (यमक) म्हणून आलेले 'खरी, भाकरी, बासरी व उशीवरी' हे शब्द 'राधिका, राधिका, यमाचा गा' ह्या वृत्ताच्या घोड्यावर किंवा उंटावर बसलेले स्वार आहेत. पण ह्या प्रत्येक स्वाराच्या मागे 'रदीफ' म्हणून आलेला 'नाही' हा शब्द हटकून बसतोच !

इस्लामपूर्व कालापासून अरब जमात काव्यप्रेमी आहे. आणि ह्या जमातीच्या जीवनात घोडा आणि उंट ह्या दोन प्राण्यांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. अरबी

भाषेनुसार 'रदीफ' या शब्दाचा अर्थ 'घोड्यावर किंवा उंटावर बसलेल्या स्वाराच्या मागे बसलेली व्यक्ती असा आहे. आणि म्हणूनच अरबांनी आपल्या छंदशास्त्रातही काफियानंतर हटकून व चिकटून मागोमाग येणाऱ्या शब्दाला किंवा शब्दगटाला 'रदीफ' हेच नाव दिले.

'रदीफ' या स्त्रीलिंगी शब्दाचे बहुवचन 'रदाफी' असे आहे.

## स्वरचिन्ह ऊर्फ अलामत

गझलेच्या पहिल्या शेरात तिचा आकृतिबंध स्पष्ट झाल्यानंतर, तिची 'जमीन' निश्चित झाल्यावर मग यमक ऊर्फ काफिया आपल्या वैशिष्ट्यांसह शेवटपर्यंत तोच कायम राहतो. काफियाचे शब्द बदलतात, पण त्याच्या अंमलबजावणीचा कायदा गझलेच्या शेवटपर्यंत तोच कायम राहतो. उदाहरणार्थ—बाटचाल, मशाल, दलाल, निकाल, रुमाल, हालचाल वगैरे.

मात्र गझलेतील अन्त्ययमक ऊर्फ रदीफ म्हणून असलेला शब्द किंवा शब्दगट शेवटपर्यंत बदलत नाही.

वर नमुन्यादाखल दिलेल्या शेरात 'मला' हे अन्त्ययमक ऊर्फ रदीफ आहे. हे अन्त्ययमक, ही रदीफ गझलेच्या पहिल्या शेराच्या दोन्ही ओळीत येणार आणि नंतर येणाऱ्या प्रत्येक शेराच्या दुसऱ्या ओळीत यमकानंतर म्हणजेच काफियानंतर हटकून येणार. उदाहरणार्थ—वाटचाल मला, मशाल मला, दलाल मला, आणि शाल मला वगैरे.

ज्याप्रमाणे गझलेच्या पहिल्या शेरात (मतला) तिचा आकृतिबंध ऊर्फ 'जमीन' वृत्त, यमक व अन्त्ययमकावरून ठरत असते, त्याचप्रमाणे ज्या जमिनीत अंगभूत असलेल्या यमकाचे ऊर्फ काफियाचे स्वरूप त्यातील स्वरचिन्हावरून ठरत असते. या स्वरचिन्हालाच 'अलामत' म्हणतात. म्हणूनच ही 'अलामत' समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे.

**यमकाच्या ऊर्फ काफियाच्या शेवटच्या न बदलणाऱ्या एका अक्षराआधी किंवा एकाहून अधिक अक्षरांआधी येणाऱ्या एका विशिष्ट अक्षरात जो न बदलणारा स्वर असतो, त्यालाच स्वरचिन्ह किंवा 'अलामत' समजावे. उदाहरणार्थ—**

**हा ठोकरून गेला, तो वापरून गेला !**<br>**जो भेटला मला तो वांधा करून गेला !**

वरील शेरात 'ठोकरून, वापरून, करून' अशी यमके ऊर्फ काफिये (कवाफी) आलेले आहेत (एकाच ओळीत दोन यमके चालू शकतात.) जर आपण या यमकांचे बारकाईने निरीक्षण केले, तर आपणास असे आढळून येईल की

'ठोकरून, वापरून, करून' या तिन्ही यमकात 'रून' ही शेवटची दोन अक्षरे बदलत नाहीत. मात्र त्यांच्याआधी येणाऱ्या–'ठोकरून'मधील 'क' या अक्षरात, 'वापरून' या यमकामधील 'प' या अक्षरात आणि पुन्हा 'करून' या यमकातील 'क' या अक्षरात–हटकून 'अ' हा स्वर आलेला आहे. क्वचित 'अ'च्या जागी ऱ्हस्व 'इ' किंवा 'उ' हा स्वर वापरला जातो. परंतु तो अपवाद समजावा.

याच गझलेतील अजून एक शेर पाहा.

**आजन्म ही तुझी मी केल्यावरी प्रतीक्षा**
**साझाच भास माझ्या अंगावरून गेला.**

वरील शेरात यमक म्हणून 'अंगावरून' हा शब्द आलेला आहे. या यमकात शेवटी 'रून' ही दोन अक्षरं अटळपणे आलेली आहेत. परंतु त्याचवेळी 'रून' या शेवटच्या दोन अक्षरांआधी असलेल्या 'व' या अक्षरातील 'अ' हा स्वर सांभाळला गेला आहे. म्हणजे 'रून' ही शेवटची दोन अक्षरे कायम आणि त्याआधी येणाऱ्या 'व' अक्षरात 'अ' ही अलामत कायम.

अलामतीची कल्पना देण्यासाठी मी याच गझलेतील अजून एक शेर येथे देतो.

**कानात कोठडीच्या किंचाळला झरोका–**
**'बाहेर एक कैदी तारा धरून गेला !'**

गझल लिहिण्यासाठी फक्त शेवटपर्यंत एकाच वृत्तात लिहून भागत नाही, तर एकदा पहिल्या शेरात यमक आपल्या स्वरचिन्हासह प्रस्थापित झाले की– अलामतीनकट काफियाचे स्वरूप स्पष्ट झाले की, मग शेवटपर्यंत त्या अलामतीच्या कायद्यानुसारच ते स्वरचिन्ह सांभाळून नंतरचे यमकाचे शब्द योजावे लागतात. उदाहरणार्थ—

हरेक आवाज आज अर्ध्यात छाटलेला !
हरेक माणूस आज आतून फाटलेला !
अरे कुणी चोरला उद्याचा पहाटतारा ?
उजेड येई दिव्यादिव्यातून बाटलेला !

माझ्याच एका गझलेचे हे दोन शेर आहेत. पहिल्या शेरात 'छाटलेला' आणि 'फाटलेला' असे दोन यमकाचे शब्द आहेत. येथे आपण जर काळजीपूर्वक विचार केला, तर आपणास असे आढळून येईल की, गझलेच्या पहिल्या शेरातच यमकाचे स्वरूप स्पष्ट झालेले आहे.

ह्या यमकात शेवटची तीन अक्षरे–'ट-ले-ला' ही अटळ आहेत, आणि त्याआधी येणाऱ्या 'छा' आणि 'फा' ह्या प्रत्येक अक्षरात 'आ' ही अलामत आहे. ह्याच कायद्यानुसार ह्या गझलेत 'काटलेला, दाटलेला, पहाटलेला,

थाटलेला, वाटलेला, झपाटलेला'; असे यमक म्हणून शब्द येतील. कारण 'ट-ले-ला' ह्या शेवटच्या तीन न बदलणाऱ्या अक्षरांआधी येणाऱ्या 'का, दा, हा, था, वा, पा' ह्या अक्षरात न चुकता 'आ' ह्या स्वराची अलामत आलेली आहे. म्हणजे आधी 'आ' हा स्वर असलेले, 'आ' ही अलामत असलेले अक्षर आणि नंतर 'ट-ले-ला' ही शेवटची तीन न बदलणारी अक्षरे, असे हे यमक आहे.

अलामत गझलेनुसार येणाऱ्या विविध यमकात आपली जागा बदलू शकते.

उदाहरणार्थ—

मी असा त्या बासरीचा सूर होतो
नेहमी ओठांपुनी मी दूर होतो
मी न केली चौकशी साधी घनांची
ऐन वैशाखातला मी पूर होतो.

ह्या गझलेत सूर, दूर आणि पूर ह्या यमकात 'ऊ' ही अलामत आहे. शेवटचे अक्षर 'र' हे आहे. येथे यमकातील शेवटून दुसऱ्या अक्षरात अलामत आहे. ही अलामत सूर, दूर आणि पूर या यमकातील 'सू, दू आणि पू' ह्या शेवटून दुसऱ्या अक्षरामधील 'ऊ' ह्या स्वराची आहे. ह्याच गझलेतील अजून एक शेर पाहा—

कोणत्या स्वप्नास आता दोष देऊ ?
जीवनाला मीच नामंजूर होतो !

ह्या शेरातील 'नामंजूर' ह्या यमकातील 'जू' ह्या अक्षरात सुरवातीचीच 'ऊ' ही अलामत आली आहे. मात्र 'र' ह्या शेवटच्या अक्षराच्या आधी येणाऱ्या अक्षरामधील 'ऊ' ही अलामत आहे.

मघाशी आपण पाहिले की, 'ट-ले-ला' ह्या तीन न बदलणाऱ्या (छाटलेला, फाटलेला) अक्षरांआधी येणाऱ्या शेवटून चौथ्या अक्षरात 'आ' ही अलामत होती तर आताच्या वरील शेरात 'ऊ' ही अलामत असून तिचे स्थान मात्र यमकाच्या शेवटून दुसऱ्या अक्षरात आहे.

गझलच्या पहिल्या शेरात 'जमीन' निश्चित होते. जमीन म्हणजे काय ह्याचे स्पष्टीकरण आधी झालेले आहेच. परंतु ह्या जमिनीत असलेले **यमक ऊर्फ काफिया कसा असावा, हे अलामतच ठरवते आणि ह्या अलामतीच्या कायद्यानुसार शेवट-पर्यंत यमक ऊर्फ काफिया चालावयाचा असतो.**

अलामत म्हणजे काय हे स्पष्ट होण्यासाठी आता मी शेवटचे उदाहरण देतो—

**वेरका होता दिलासा मानभावी धीर होता !**
**पाठ राखायास माझी लाघवी खंजीर होता !**

मी जरी हासून आता बोलतो आहे ऋतूंशी
ऐन तारुण्यात माझा चेहरा गंभीर होता !

वरील शेरात ' धीर, ख्जीर ' आणि ' गंभीर ' ह्या यमकातील ' धी, जी आणि भी ' ह्या अक्षरात ' ई ' ह्या स्वराची अल्लामत आहे. शेवटचे ' र ' हे अक्षर मात्र कायम !

## महत्त्वाचे—

★ गझल लिहिण्यासाठी निर्दोष वृत्तात लिहिता येणे आवश्यक आहे. शक्यतोवर गणवृत्तात लिहावे. अगदी आवश्यक असल्यासच मात्रावृत्तांचा (जातीचा) उपयोग करावा.

★ गझल लेखनासाठी नेहमी फक्त एकाच वृत्ताचा उपयोग करू नये. वेगवेगळी वृत्ते वापरावीत. त्यामुळे आपली शब्दांवरील पकड अधिक मजबूत होते.

★ प्रत्येक शेर म्हणजे एक संपूर्ण कविताच असते. गझल उलगडत नसते. कोणताही शेर सुटा वाचला तरी तो संपूर्ण अभिव्यक्ती असलेली कविता वाटणे, हे गझलचे गमक आहे. नुसत्या आकृतिबंधाने गझल ठरत नसते.

★ बदलत्या काळात संदर्भानुसार गझलमधील शेरांचे संदर्भ बदलू शकतात. पण गझल म्हणजे काय हे कवीच्या सोयीनुसार ठरत नसते. आणि ते समीक्षकांच्या सोयीनुसार नव्हेच नव्हे !

★ जे आपणास शेरात सांगायचे आहे, ते सांगतांना जर आपणास अडचण येत असेल, तर आधी आपली संकल्पना सरळ गद्यात (किमान शब्दात) लिहून काढावे. म्हणजे आपला गोंधळ होत नाही व आपणास जे सांगायचे आहे, ते आपल्याला स्पष्टपणे अचूक कळते.

★ मराठी गझलेसाठी आवश्यक असलेल्या प्रतिमा, रूपके आणि संकेत महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वातावरणात भरपूर आहेत. मराठी गझलेला मराठी मातीचाच सुगंध आला पाहिजे.

★ यमक, अन्त्ययमक आणि वृत्ताचे बंधन पाळूनमुद्धा शेर अगदी सहज व सोपा पण तितकाच गोटीबंद असावा. फालतू शब्दांना जागा नसावी. अनावश्यक शब्दांनी वृत्ताची मात्रापूर्ती करू नये.

★ शेर सहज कळावा आणि ऐकणाऱ्याच्या किंवा वाचणाऱ्याच्या थेट हृदयात शिरावा, अशी शब्दांची मांडणी असावी. जणू आपण बोलत आहोत, असा शेर असावा. सोपेपणा हे यशस्वी शेराचे रहस्य होय.

* शेरातील दोन्ही ओळींचा परस्परांशी संबंध असलाच पाहिजे. शेर म्हणून परस्परांशी संबंध नसलेल्या दोन सुंदर ओळी एकत्र लिहिल्या म्हणजे शेर होत नाही. शेरात जे सांगायचे आहे त्याची प्रस्तावना पहिली ओळ असते, तर दुसरी ओळ म्हणजे पहिल्या ओळीतील प्रस्तावनेचा प्रभावी समारोप असतो.

* गझलमधील शेर विरोधाभासावरच (Paradox) आधारित असतात, ही समजूत पार चुकीची आहे. स्थलाभावी नमुन्यादाखल माझा एकच शेर येथे उद्धृत करतो—

उरली विरंगुळ्याला ही सांजवेळ माझी
उरल्या तुझ्या जराशा प्राणात हालचाली!

* शेर लिहितांना शेवटच्या शब्दातील शेवटचे अक्षर लघु असल्यास ते कधीही गुरू नये.

शेराच्या ओळीतील शेवटी असलेले लघु अक्षर गुरू करण्याची एक अत्यंत वाईट खोड मराठीतील बऱ्याच कवींना फार वर्षांपासून लागलेली आहे. उदाहरणार्थ—

ही वाट हुंदक्यांची थकली आता रडून ऽऽ
रहदारि गच्च आहे देवा तुझ्यापुढून ऽऽ

एकवार 'रहदारि'मधील ऱ्हस्व 'रि' समजून घेता येईल. पण ओळ संपतांना हा 'न ऽऽऽऽऽ' कशासाठी ?

म्हणून निदान तरुण पिढीने तरी ही चूक करू नये. व्याकरणाची बात बाजूला ठेवली तरी शेवटच्या लघु अक्षराला ओढूनताणून गुरू केल्यावर ओळीतील प्रसाद व माधुर्य कमी होते, हाही मुद्दा लक्षात घ्यावा.

* गझलेची भाषा तिच्या पिंडाला मानवणारी असावी ज्याचा आपल्या मातृभाषेवर संपूर्ण ताबा आहे त्याला कोणताही विषय किंवा कोणतीही भावना शिवीगाळ न करता तेवढ्याच प्रभावीपणे शेरातून व्यक्त करता येते. क्वचित प्रसंगी अगदी अपरिहार्य झाल्यास एखादा असा शब्द त्या शेराच्या अभिव्यक्तीत चपखलपणे बसत असल्यास उपयोगात आणायला हरकत नाही. पण तसा शब्द अपरिहार्य असावा.

महाराष्ट्रातील तरुण पिढी ह्या माहितीचे सार्थक करील आणि महाराष्ट्रात यापुढे अधिकाधिक उत्कृष्ट व निर्दोष मराठी गझला लिहिल्या जातील, अशी मी आशा बाळगतो.

जरी या वर्तमानाला, कळेना आमुची भाषा
विजा घेऊन येणाऱ्या, पिढ्यांशी बोलतो आम्ही !

---



२५८२
२५८०३

REFBK 0025873

REFBK-0025873